म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : बा.वा.
सं.क्र. : १४७६१

IRBK-0114761

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

विनोदविकासमाला

संयोजक :– श्री. गोपीनाथ तळवलकर.

संच २ रा

पुस्तक ५ वे

# वनगावचा सदू

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्रा. क्र. १४८८९ नों. दि. ..........
वि. .......... क्र. ..................

लेखिका

डॉ. सौ. चारुशीला गुप्ते

IRBK-0114761

प्रकाशन क्रमांक १०९

किमत तीन रुपये

प्रकाशिका
सौ. निर्मला नारायण अरगडे
अरगडे कुलकर्णी प्रकाशन,
१६/२२४ लोकमान्यनगर
पुणे ३०

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९७३

© सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन

चित्रकार : आर्. एस्. कंटक

मुद्रक :
प्रभाकर सरदेसाई *M.Sc.*
अक्षर मुद्रणालय,
४७ इंडस्ट्रियल इस्टेट,
लोणावळा (जि. पुणे)

## दोन शब्द

डॉ. सौ. चारुशीला गुप्ते यांनी ह्या पुस्तकात एका सरळ आणि ध्येयवादी कुमाराचे शब्दचित्र रेखाटले आहे. सदू हा ग्रामीण विभागात रहाणारा एक उत्साही कुमार आहे. त्याच्या मूळच्या प्रवृत्ती निकोप आणि सात्विक आहेत. धर्माचे रहस्य जी दयाशील वृत्ती ती त्याच्या अंगी भरपूर आहे. पण सदूची सात्विकता भोंगळ नाही तर सावध आहे. वेळप्रसंगी कपटाशी युक्तीने सामना करून सदू विजय मिळवितो. यातील ताईताचे प्रकरण यादृष्टीने वाचनीय ठरेल. आपण ज्या गावात रहातो, त्या गावाचें आपण काही ऋण लागतो आणि म्हणून त्यासाठी आपण काही केले पाहिजे ही जाणीव सदूला आहे. अशा कुमारांमुळेच ग्रामोद्धार सुलभ होतो.

डॉ. चारुशीला गुप्ते यांनी हे सर्व विवेचन बोधाचा बोजा वाटणार नाही अशा कुशलतेने केले आहे. आज खेडेगावे बदलत आहेत. विज्ञानयुग मंद पावलांनी का होईना खेडोपाडी संचार करू लागले आहे. अशावेळी नवीन पिढीने या युगातील सुविधा आपल्या समाजाच्या कल्याणाकरिता कशा वापरता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. जीवन सुखी करण्याची नवी साधने नुसती उपलब्ध होऊन भागत नाही, तर ती व्यक्ती आणि समाज यात नेमकी कशी बसवायची हे कळावे लागते. हे काम मुख्यतः नव्या कुमारांचे आणि तरुणांचे आहे. या दृष्टीने सदू हे व्यक्तिचित्र निर्माण करून डॉ. चारुशीला गुप्ते यांनी एक प्रकारचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले आहे. केवळ मुलांनीच मनोरंजन म्हणून नव्हे, तर खेड्यातील समाजसेवकांनीही विचारात घ्यावे असे हे पुस्तक आहे.

—गोपीनाथ तळवलकर

छोटयांनो,

ह्या पुस्तकाच्या द्वारे खेडयात राहणाऱ्या एका धडपडया मुलाचे चित्र मी तुमच्यापुढे ठेवीत आहे.

महाराष्ट्र राज्य समाज कल्याण समितींची सदस्या म्हणून मला नेहमी अनेक खेडयांना भेटी द्याव्या लागतात. तेथे अशी सदूसारखी कित्येक उत्साही मुले मला पहावयास मिळतात. अशा सर्व धडपडया व काहीतरी चांगले करून दाखवावे अशी मनीषा बाळगणाऱ्या मुलांचा 'सदू' हा एक प्रतिनिधी आहे. अशा मुलांना चांगले वळण लावायला व त्यांच्या बुद्धीला व उत्साहाला मार्गदर्शन करावयास विष्णूमास्तरांसारख्या समंजस, सुशिक्षित आणि समाजहितदक्ष व्यक्ती हव्यात.

सदूला, गुरुजींकडून प्रेरणा मिळाली, त्यामुळे तो अनेक चांगल्या गोष्टी करू शकला व त्याने आपल्या बनगावचे नाव उज्ज्वल केले.

या निमित्ताने जशी तुम्हा छोटया वाचकांना खेडयातील जीवनाची ओळख होईल. त्याचप्रमाणे लोकजीवनाचा सुधार होण्यासाठी ज्या काही सरकारतर्फे अभिनव योजना पुढे येत आहेत. त्यांचाही थोडाबहुत परिचय तुम्हाला होईल.

–तुम्हाला हे पुस्तक आवडले तर या पुस्तकाचे चीज झाले असे मी समजेन. हे पुस्तक 'अरगडे आणि कुलकर्णी' सारख्या ध्येयवादी बालसाहित्य प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होत आहे याबद्दल मला समाधान वाटत आहे.

मुंबई

दिनांक १५-६-१९७३

–सौ. चारुशीला गुप्ते

# १. सदूची अल्पबचत

सायली नदीच्या काठी असलेले बनगाव नावाचे खेडे फारच टुमदार होतें. सह्याद्रीच्या वेगवेगळ्या डोंगरांच्या रांगांच्या कुशी-मध्ये ते असून त्यातल्याच एका डोंगरावरून खळखळ आवाज करून वाहणाऱ्या सायली नदीचा उगम झाला होता. तिच्या पाण्याला खूप जोर.असल्यामुळे तिच्या पृष्ठभागावर 'सायली'च्या फुलां-सारखा पांढरा शुभ्र फेस दिसून येत असे. तसेच तिच्या काठावर रानसायलीच्या अनेक वेली इतस्ततः पसरलेल्या दिसून येत. या दोन्हीपैकी एका कारणास्तव तिला बनगावच्या गावकऱ्यांच्या पूर्वजांनी 'सायली' हे नाव दिले असावे. इतके मात्र खरे की ते नाव तिला अगदी शोभून दिसत असे. या नदीच्या आसपास हिरव्या-गार गवताची कुरणे होती. त्या गवतावर निळी, तांबडी, सोन्या-सारखी पिवळी चिमुकली रानफुले फुलायची आणि ती त्यांच्या-वर मजेने उडणाऱ्या छोटचा छोटचा फुलपंखी सारखीच दिसायची. आजुबाजूला वड, पिंपळ, औदुंबर, जांभूळ, फणस, आवळी, आंबे यांची दाट झाडी होती. याखेरीज आजुबाजूला गावातील शेत-कऱ्यांची शेतें व मळे होते.

सायली नदीचे पाणी अपरंपार होते. उन्हाळ्यातही तिचे पाणी कधी आटायचे नाही. नदीच्या काठावर एक शिवमंदिर

होतें. तिथे घाटही बांधला होता. गावातील स्त्रीपुरुष तेथे स्नान करायचे, कपडे धुवायचे आणि स्त्रिया पाण्याचे घडे भरून न्यायच्या. सायलीच्या पाण्याचा हा एवढाच उपयोग बनगावातील लोक करून घेत असत. परंतु त्यातून पाट काढून शेतीमळ्याला त्याचा उपयोग करून घेण्याचा गावकऱ्यांनी कधीच प्रयत्न केला नाही.



सदूचे घर नदीपासून अर्ध्या मैलावर होते. त्याच्या वडिलांचे नाव होते जानोजी पाटील आणि आईचे नाव होते पार्वती. त्याला दोन बहिणी आणि दोन भाऊ होते. बहिणींपैकी तान्हुबाई सर्वात मोठी! तिचे लग्न झाले होतें. तिचे सासर सायली नदीच्या पलीकडच्या तीरावर असलेल्या पाडळी नावाच्या खेड्यात होते. तिच्या पाठचा सदू तेरा चौदा वर्षांचा होता. बाकीची भावंडे अद्यापि लहानच होती.

गावात शाळा अशी नव्हतीच. ब्राह्मण आळीमध्ये विष्णूपंत दातार हे तालुक्याच्या शाळेतील सेवानिवृत्त मास्तर रहात होते.

ते गावातील मुलांना, मारुतीच्या देवळात बोलावून त्यांना साक्षर करण्याचा प्रयत्न करीत असत. त्यांना सर्वजण विष्णूमास्तर म्हणत असत. ही मुले नेहमी शिकायला येत नसत. कारण त्यांना गुरां-पाठीमागे जाणे, शेण, लाकडे गोळा करणे अशी कामे करावयाची असत. शिवाय शिक्षणाचे महत्त्व न समजणारे त्यांचे आईबाप त्यांना शिकायला जाण्याची मनाई करीत. सदू मात्र नियमित या वर्गात शिकायला जाई. तथापि त्याचे वडील त्याच्यावर त्याबद्दल खूप रागवत असत. ते म्हणत,

"पोरा, आपनास्नी सायबावानी शिकूनशानी काय कराय-चंय्–आपली जमीन तीच आपली आय है–तिचं काम शिक."

तरीपण सदू चोरून मारून अक्षरे गिरवीत बसत असे. त्यासाठी त्याला बापाच्या हातचा मार आणि आईच्या शिव्या भरपूर खाव्या लागत

सदू बुद्धीने तल्लख होता. त्यामुळे तो मास्तरांचा आवडता होता. ते त्याला पाटी पेन्सिली मोफत देत असत. हळूहळू सदूला चार शब्द चांगल्या रीतीने वाचता येऊ लागले. मास्तरांचा मुलगा दिनू आणि गावातील सोनार गणपतशेठ यांचा मुलगा रघू हे सदूचे जानी दोस्त. ती तिन्हीही मुले मोठी चलाख व तरतरीत असून त्या वयातही आपले गाव तालुक्यातील इतर काही गावा-प्रमाणे सुधारावे, आपण स्वत: त्यासाठी काही प्रयत्न करावेत असे त्यांना नेहमी वाटे.

सदूच्या बापाला दारू पिण्याचे व्यसन होते. तो दारू पिऊन आला की मुलांना व बायकोला मारीत असे. सदूला त्याबद्दल बापाचा फार राग येई.

सदूचे घर छोटे, पण तसे छान होते. त्याच्या खापर-

पणजोबाने जमीन चांगली कसून थोडी माया केली होती. त्यामुळे घर बांधताना दगडांचं जोतं त्यांनी बांधलं होतं. घराच्या भिंती पण दगडी होत्या. घराच्या पुढे, पाठीमागे अंगण होते. मागच्या अंगणात विहीर होती. त्यामुळे सदूची आई घरच्या घरी भाजी-पाला लावीत असे. तरीही बापाच्या व्यसनामुळे घरात दोन वेळा खायची पण पंचाईत असे. सदूची आई खूप काबाडकष्ट करी, परंतु मोलमजुरी करून आणलेले पैसे पण त्याचा बाप तिच्याकडून घेई व ते दारू पिण्यात खर्च करीत असे.

गावामध्ये घेलाशेठ नावाचा एक श्रीमंत मारवाडी राहात असे. गरीब शेतकरी अडचणीत सापडला की कोऱ्या कागदावर अंगठा उठवून घेऊन त्यांना दहा-वीस पासून शंभर दोनशे रुपयां-पर्यंत दामदुप्पट व्याजावर कर्जाऊ पैसे देत असे आणि कागदा-वर आकडेही खोटे लिहीत असे. शेतकरी निरक्षर असल्यामुळे त्यांना कागदावर लिहिलेले वाचता येत नसे. अशा रीतीने तो त्यांची शेते, वाडया, घरे गिळंकृत करून गब्बर झाला होता.

सदूच्या बापाने जानोजीनेही त्याच्याकडून पैसे उसनवार काढून आपली वाडी व शेत त्याच्याकडे गहाण टाकले होते. पण घेलाशेठचा डोळा जानोजी पाटलाच्या टुमदार घरावर होता. एके दिवशी जानोजीजवळ एक पैसाही नव्हता. त्याला दारू पिण्याची तल्लफ आली. शेवटी तो सावकाराकडे गेला व म्हणाला,

"शेठ, दया करा आणि वीस रुपये तरी मला द्या, फार उपकार होतील."

"अरे जा– माझ्याकडून तुला एक दमडीही आता मिळणार नाही. तुला आतापर्यंत मी एक हजार रुपये कर्ज दिले आहे. ते

अगोदर फेड."

जानोजी फारच गयावया करू लागला. तेव्हा मारवाडी म्हणाला,

"तुझं घर माझ्याकडे गहाण टाक मग मी देतो."

"असं कसं म्हणता शेठ? एक हजार रुपये मी कर्ज कुठं घेतलंय– पहिल्यांदा दहावेळा दहा वीसा अन् वैशाखात वीस रुपये एवढेच तर घेतलंयत."



त्याचे ते शब्द ऐकून सावकार लाल डोळे करून रागाने ओरडून म्हणाला,

"अरे चोरा–पैसे घेऊन सवरून वर खोटं बोलतोस होय रे? माझ्याजवळ कर्ज घेतल्याचे कागद नाहीत काय ? त्यावर तुझा अंगठा उठवून घेतलाय्. बोलाव चार लोकांना म्हणजे दाखवतो-

कोण खोटा अन् कोण खरा ते!"

सावकाराचा राग पाहून बिचारा जानोजी घाबरला. तो गयावया करून म्हणाला,

"सावकारानो, असं रागावू नका. मी अडाणी, मला काय समजतयं म्हणूनशानी बोललो. चूक झाली–"

"अस्स, आता कसा वळणावर आलाय्–तुला वीस रुपये हवेत तर घरी जा. आणि काही दागदागिना घेऊन ये–" असे म्हणून सावकार घेलाशेट ओटीवरून आतमध्ये निघून गेले.

जानोजी मनाशी चरफडत घरी गेला आणि बायकोबरोबर तंटा करू लागला. तिला चार शिव्या हासडून तो म्हणाला,

"तू मोठी लबाड बायको हायस. तुझ्याजवळं पैका हाय. पण मला देत न्हायस–"

"माज्याजवळ पैका असता तर चार मुलावाळांना उपाशी ठेवलं असतं व्हय?" तिने त्याला विचारले.

त्याबरोबर जानोजी फारच संतापला. तो सदूला हाक मारू लागला–तो मास्तरांकडे शिकायला जात असे तें त्याला सहन होत नसे. सदू हाक ऐकून आला नाही ते पाहून तर तो फारच खवळला व म्हणाला,

"त्या बामन मास्तरानं पोराला बिगडवलाय्. चांगला गुरा-पाठी जायचं सोडून लिवायला शिकतोय्–साहेब व्हनार हाय जनूं!"

"अवो पन शिकू द्या पोराला! गुरापाठी तर रोज सकाळी जातोच तो! फावल्या येळात शिकंना का तो–"

"बरं-बरं–तूच त्याला बिगडवलायस." असं म्हणून तो त्याच्या दारुबाज मित्रांच्या अड्ड्याकडे निघून गेला.

नवरा निघून गेल्यावर बिचारी पार्वती एका कोपऱ्यात बसून रडू लागली. तेवढ्यात सांजावलं. सदू गुरांना घेऊन परत आला. आपल्या घरच्या गाईला व दोन बैलांना गोठ्यात बांधून तो हातपाय धुऊन घरात आला तर आई कोपऱ्यात बसून मुळूमुळू रडतेय् असं त्याला दिसून आलं. सदूचे आईवर फार प्रेम होते. तो चटकन् तिच्याजवळ बसून म्हणाला,

"का ग आई? काय झालं?"

तिने त्याला मारवाड्याच्या कर्जाची हकीकत सांगितली. ती म्हणाली,

"सदू, तुझ्या बापानं समदं त्याच्याकडे गहाण टाकलंय्. आता फक्त एवढं छप्पर डोईवर राह्यलंय्. त्या मेल्या सावकाराची या घरावरच नजर हाय. काय करायचं? काल हितं येऊन मला धमकी देऊनशानी गेला—"

"काय म्हणाला?"

"तो म्हणाला, तुझ्या नवऱ्याने घेतलेल्या कर्जापैकी थोडं बहुत देऊन टाक नायतर घरावर टाच् आणीन."

"मग आता काय करायचं ग आई?"

"पोरा, घरात तर आता फुटका मनी बी शिल्लक न्हाई राह्यला. माज्या गळ्यातील सासूबायनी दिलेली पुतळ्याची माळ, डोरलं—समदं तुझ्या बापसानं दारुपायी उडवलं. दोन म्हशी, चार बैल, आपला मळा सारं गहाण टाकलंय्—" बोलता बोलता तिला हुंदका आला.

"आई, तू रडू नकोस. मी आता शिकतोय ना मास्तरांजवळ. मी मोठा झालो की खूप पैसा मिळवीन आणि आपलं सारं गमावलेलं सावकारांकडून सोडवून घेईन. उगी रहा."

त्याला पोटाशी धरून पार्वती म्हणाली,

"लई गुनाचा आहेस तू. मोठा हो अन् कुळाचं नाव राख."

दुसरे दिवशी रामप्रहरीच घेलाशेट सावकाराचा मुनीम अंगणात येऊन ठेपला आणि ओरडून म्हणाला,

"ए जान्या, सावकाराने हप्ता मागितलाय्. नाय दिला तर परिणाम वाईट होईल."

जानोजी अजून झोपून उठलाच नव्हता. पार्वती अंगणात येऊन त्याला म्हणाली,

"धनी आजून उटलं न्हाईत. सावकारांना सांगा मी संध्याकाळपर्यंत कायतरी पाठवून देते. मुनीमजी– बरं का एवढी मेहरबानी करा."

मुनीमजी तावातावाने म्हणाला,

"हे बघ पार्वती, आमच्या धन्याशी गाठ आहे. पुन्हा पुन्हा खेपा घालायला लावू नकोस." एवढं बोलून ओटीवर बसत तो पुन्हा जरा खालच्या स्वरात म्हणाला,

"हे बघ पार्वती, जान्याला अक्कल कमी आहे. तू शहाणी आहेस. आतापर्यंत त्याने एक हजार रुपये शेटजीकडून नेले आहेत."

"काय? – एक हज्जार? नाय हो, येवडा पैका ते कशापायी घेतील?"

"होय– एक हजार! तुला बाईमाणसाला त्यात काय कळतंय! तुमच्या भल्याचं मी सांगतो ते ऐक."

गयावया करीत पार्वती म्हणाली,

"सांगा मुनीमजी, मी तुमची वहीन समजा–"

"हे पहा, हे तुमचं घर कर्जाच्या बदल्यात शेटजींना देऊन

टाका– हवं तर वर आणखी शे-दोनशे रुपये मी द्यायला लावीन त्याच्याकडून तुम्हाला." मुनीमजीने कावेबाजपणाने तोडगा सुचविला.

"असं नका व्ह सांगू! वाडवडिलांनी बांधलेलं हे घर तरी आमच्यापाशी राहू द्या." पार्वती गयावया करीत म्हणाली.

सदू हे सर्व मागे उभा राहून ऐकत होता. तो पुढे येऊन म्हणाला,

"वा रे वा ! मुनीमजी, तुमच्या शेटने आमचे बैल, गायी, मळा सगळं काही घशात घातलं– आता घरावर डोळा होय? हे घर आमचं आहे. आम्ही ते त्यांना कधीच देणार नाही."

त्याचे ते शब्द ऐकून मुनीमजी रागाने ओरडून म्हणाले,

"गप्प बस पोरा– तुझ्या बापाने कर्ज काढलंय्– घर काय शेटजी मोफत मागत नाहीत. हल्ली त्या ब्राह्मणाकडे शिकायला जाऊन फारच चढेल झाला आहेस तू– पार्वती, आजच्या आज थोडी तरी रक्कम आम्हाला मिळाली पाहिजे. म्हणून जान्याला निरोप सांग– आणि मी तुमच्या हिताचं सांगितलंय् त्याचा विचार कर–" असे म्हणून ते तेथून चरफडत निघून गेले.

आईने दिलेली भाकर चटणी बांधून घेऊन सदू गुरांना चरायला रानात घेऊन गेला. गुरांना चारा खायला लावून तो सुन्न मनानं एका झाडाखाली बसून राहिला. सावकाराने त्याचे दोन आवडते बैल कब्जात घेतले होते. त्यांची नावे ढवळ्या आणि पवळ्या अशी होती. त्यांची त्याला आठवण आली व त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. आता सावकार आपले छोटेसे घर पण घशात घालील आणि आपणा सर्वांना उघड्यावर पडावे लागेल याबद्दल त्याला धास्ती वाटू लागली.

संध्याकाळी तो नेहमीप्रमाणे मास्तरांकडे शिकायला गेला. ते तालुक्याच्या गावी गेले होते. पण त्याचे दोन्ही मित्र तेथे होते. त्याचा उतरलेला चेहरा पाहून त्या दोघांनी त्याला विचारले,

"काय रे सदू, तुझा चेहरा असा कसानुकसा का दिसतोय? वडिलांनी मारलं की काय?"

सदूने त्यांना सारी हकीकत सांगितली. तेव्हा मास्तरांचा मुलगा– दिनू म्हणाला,

"अरे, तू काळजी करू नकोस. कालच आपण आपल्या धड्यात वाचलंय ना की जी माणसं सत्याने वागतात, त्यांचं देव चांगलं करतो. तेव्हा तू काही काळजी करू नकोस."

"होय रे, पण उद्या जर त्या मारवाड्याला थोडे तरी पैसे दिले नाहीत तर कसं होणार ?"

"हे बघ, आता गुरुजी घरी येतील तेव्हा त्यांना आपण सांगू. ते काहीतरी मार्ग काढतील बघ." रघू म्हणाला.

मित्रांचा तो सल्ला सदूला पसंत पडला. मग ते तिघेजण सायली नदीच्या काठच्या आंबराईमध्ये फिरावयास गेले. तेथील थंड हवेने आणि मित्रांच्या संगतीमध्ये सदूही आपली चिंता क्षणभर विसरला.

मास्तर तालुक्याच्या गावाहून साताच्या एस्. टी. ने परत येणार होते. बनगावला एस्. टी. स्टँड नव्हता. गावापासून एक मैल अंतरावर गाडी रस्त्यावर उभी राहत असे व मग तेथून गावातल्या प्रवाशांना चालत आत यावे लागत असे. रस्ता नदीकाठावरूनच होता.

साडेसाताच्या सुमारास मुलांना मास्तर गावाकडे येताना आढळून आले. त्यांना पाहून विशेषतः सदूला फारच आनंद झाला.

कारण मास्तरांकडून त्याला घरची अडचण दूर करण्याचे मार्गदर्शन मिळणार होते. मुलांना पाहून मास्तरांनी विचारले,

"काय रे, फिरायला आला होतात होय?"

"गुरुजी, तुम्ही घरी नव्हता म्हणून आम्ही इथं आलो नि तुमची वाट पहात बसलो." मास्तरांच्या हातातल्या दोन पिशव्या घेत घेत रघू म्हणाला.

"बरं–चला आता घरी जाऊ." मास्तर वाट चालू लागले.

घरी गेल्यावर मास्तरांनी चहापाणी घेतले व तालुक्याच्या गावाहून आणलेला खाऊ त्या तीन मुलांना दिला. सदूचा उतरलेला चेहरा पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी प्रश्न केला,

"सदू, बाळ, आज काय झालंय? तू नेहमीसारखा हसत बोलत नाहीस तो?"

मास्तरांचे ते सहानुभूतीचे उद्गार ऐकून सदूला एकदम हुंदका आला. तेवढ्यात दिनूने आपल्या वडिलांना सदूच्या चिंतेसंबंधी सर्व काही सांगितले. त्याबरोबर मास्तर हसून म्हणाले,

"हत् वेड्या–अरे एवढ्यासाठी चिंता कशाला? त्या घेलाशेटला मी चांगला ओळखतो. गावातल्या गरीबगुरीबांना तो पिळून काढतोय. दहा रुपये कर्ज द्यायचं आणि शंभरावर अंगठा उठवून घ्यायचा अस्सं चालवलंय् त्यानं. म्हणूनच मी गावातल्या लोकांना सांगतो की साक्षर व्हा म्हणजे अशी फसवणूक होणार नाही."

सदू हुंदका देत म्हणाला,

"पण––गुरुजी, आता आम्ही काय करावं?"

"सदू वेड्या, थोडी तरी रक्कम द्याल तर तावडतोब घराचा कब्जा घेणार नाही असं तो म्हणतोय् ना. आपण देऊ त्याला–"

"पण बाबा, असे अन्यायाने निरक्षर शेतकऱ्यांच्या अज्ञा-

नाचा फायदा घेणाऱ्याविरुद्ध आपण काहीतरी केलं पाहिजे."

"मुलांनो, तुम्हाला अजून कायदा म्हणजे काय ते समजत नाही. अंगठा उठवून दिल्यानंतर कर्जाचा कागद कायदेशीर होतो. त्याविरुद्ध आपण सावकाराला काहीच शासन करू शकत नाही."

"मग आता सदूच्या घराचं कसं होणार?" रडकुंड्या स्वरात रघूने विचारलें.

"सदूचे साठविलेले पैसे त्या सावकाराला देऊन आजचे संकट उद्यावर घालवायचे."

"माझे पैसे?" सदूने आश्चर्याने विचारले. दिनू व रघूही चकित होऊन मास्तरांकडे पाहू लागले.

"होय! सदूचे पैसे! गेली पाच वर्षे तो आपली गुरं राखतोय् ना. त्याबद्दल त्याने पैसे घ्यायचे नाकारले—"

"हो– तो म्हणाला– गुरुजींकडून मी धडे शिकतो, मी पैसे घेणार नाही!" दिनू उद्गारला.

"त्याचे ते पैसे मी पाच वर्षांच्या कराराने अल्पबचत म्हणून पोस्टामध्ये ठेवले होते. शिवाय त्यात आणखीही मी त्याला बक्षीस म्हणून काही पैसे घालीत असे. आता व्याज धरून दोनशे रुपये साचले आहेत. ते पुढच्या महिन्यात काढता येतील. कारण पाच वर्षांची मुदत पुढच्या महिन्यात संपेल. तोपर्यंत मी माझ्याजवळचे पैसे त्याला देऊन थोडे दिवस तरी निभावून नेऊ."

सदूने चटकन् उठून मास्तरांचे पाय धरले व तो म्हणाला,

"गुरुजी, तुम्ही आज आम्हाला वाचवलंत."

"मी नव्हे वेड्या, अल्पबचतीच्या योजनेनं! मी देतो ते पैसे गुपचूपपणे आपल्या आईजवळ दे. व इतके पैसे पोचले असे त्याच्याकडून स्टँपवर लिहून घेण्यासाठी तू तिच्याबरोबर जा–"

"बाबा तो मारवाडी या सदूला दाद देणार नाही. तुम्हीच जा त्याच्या आईबरोबर." दिनू म्हणाला.

"बरं तर उद्या अकरा वाजता मी घेलाशेटकडे येतो, असे आईला सांग. जा आता घरी. शिकायचं मात्र सोडू नकोस."

मास्तरांनी दिलेले पैसे घेऊन सदू पळत घरी आला. त्याचा बाप अद्यापि घरी आला नव्हता. घरात शिरल्याबरोबर त्याने आईला एकीकडे नेऊन ते दोनशे रुपये तिच्या स्वाधीन केले. त्याबरोबर ती घाबरून म्हणाली,

"सद्या, ह्यो एवढा पैका कुटूनशानी आणलास. पोरा, चोरी-बिरी तर न्हाई ना केलीस?'

"वा ग आई. या तुझ्या मुलावर तुझा विश्वास नाही होय ?

असे म्हणून मास्तरांनी त्यांची गुरं पाळल्याबद्दलचे पैसे पोस्टात अल्पबचत खात्यात कसे गुंतवले होते, त्यासंबंधी तिला सांगितले. ते ऐकून तिला आनंद झाला. ती म्हणाली,

"पोरां, लई ब्येस योजना हाय ही! मी आता पन दळणकांडण करून पैसा मिळवते त्यातला थोडा असाच बाजूला काढून ठेवीन."

"पण आई. हे पैसे नीट लपवून ठेव. बाबांच्या दृष्टीला पडू देऊ नकोस. नाहीतर ते सगळे पैसे दारूवर खर्च करतील."

मग पार्वतीने ते पैसे लपवून ठेवले. दुसरे दिवशी ती अकरा वाजता ते पैसे घेऊन सावकाराकडे गेली. मास्तर तेथे आधीच येऊन बसले होते. तिला पाहून सावकार म्हणाला,


"काय ग, पार्वती आणलेस काही की नाही?

व्हय, सावकार हे दोनशे रुपये आनले हायेत ते घ्या लवकरच आमी तुमचं समदं कर्ज फेडू."

"बरं बरं– या चोपडीमध्ये मांडून ठेवतो पैसे पोचले

म्हणून–"

"असं कसं म्हणता सावकार घेला शेटजी? या बाईला रीतसर स्टँप लावून रिसीट दिली पाहिजे तुम्ही? कायदाच आहे तसा–"



विष्णू मास्तरांबद्दल गावात तसा फारच दरारा होता. त्यामुळे सावकाराने मनाशी चरफडत कर्जापैकी दोनशे रुपये पोचल्याची स्टँप रिसीट पार्वतीला दिली. ती तिने मास्तरांकडे ठेवायला दिली.

लवकरच साऱ्या गावात सदूने गुरे राखल्याबद्दल मिळालेले पैसे अल्पबचतीमध्ये गुंतवून काही अंशी बापाच्या कर्जाची फेड केल्याची बातमी पसरली. त्यामुळे अनेक जणांनी अल्पबचतीचा फायदा करून घेण्याचा निश्चय केला. मुलेही त्यांना खाऊसाठी

मिळालेले पैसे अगर शेतावर किंवा गुरापाठी जाऊन केलेल्या कामातील पैसे गुरुजींच्या मदतीने तालुक्याच्या गावातील पोस्टात गुंतवू लागले. आणि गावाला एक चांगले वळण लागले. सावकार मात्र त्यामुळे मनातल्या मनात फारच जळफळू लागला.

* *

## २. सोन्याचा ताईत

पार्वतीने सावकाराला दोनशे रुपये दिल्याचे जानोजीला कळले. तेव्हा त्याला मनातून हायसे वाटले. पण 'आपल्या पोरानं गुरं राखण्याचे पैसे आपल्या स्वाधीन न करता मास्तरांजवळ ठेवले. याबद्दल त्याला फार राग आला. संध्याकाळी गुरे राखून सदू घरी आला तेव्हा जानोजीने त्याला काठीने झोडपून काढले पार्वती मध्ये पडली व म्हणाली,

"अवो, पोराला बडवता कशापायी! त्याच्यामुळं संकट फुडं गेलं नव्हं का?"

"बरं बरं– तू याला लई बिगडवून ठेवला आहेशी! अन् तो लिवायला शिकविनारा मास्तरबी तसाच हाय."

असेच काही दिवस गेले. आता गावातले बरेच लोक आपली मुले मास्तरांकडे पाठवू लागली होती. त्यामुळे मास्तरांची ओटी विद्यार्थ्यांनी भरून जाई. त्यादिवशी मुले जेव्हा जमली तेव्हा त्यांना मास्तरांकडे एक पाहुणा आलेला दिसला. पाहुण्यांचे वय तिशीच्या

आत होते. त्यांचा चेहरा हसतमुख असून ते चेहऱ्यावरून सुस्वभावी दिसत होते. सदूला तर पाहुणे फारच आवडले.

थोड्याच वेळात मास्तर बाहेर आले व त्यांनी पाहुण्यांची मुलांशी ओळख करून देताना म्हटले,

"मुलांनो, हा माझा भाचा राजेश! तो डॉक्टरीची परीक्षा पहिल्या वर्गात पास झाला आहे. आपल्या गावाच्या बाहेर जो जुना अभयगड आहे ना, त्याच्या आसपासच्या जंगलातील काही औषधी वनस्पतींचे संशोधन करण्यासाठी तो इथं आलाय्. तो इथं सहा सात महिने रहाणार आहे. तुम्ही पण त्याला, वनस्पती शोधायला मदत करा वरं का."

सारी मुले एका आवाजात ओरडली,

"होय गुरुजी– आम्ही जरूर मदत करू. आम्हाला राजेशभाऊ फार आवडले आहेत.

त्यावर राजेश मुलांकडे पाहून गोड हसला व म्हणाला,

"शाबास मुलांनो, चांगल्या कामासाठी माणसानं नेहमी पुढं यायला हवं! मी पण तुमच्यासाठी काहीतरी करीन. मला तुमचा मित्र समजा."

इतका छान, हुशार डॉक्टर मित्र मिळाल्याबद्दल मुलांना खूप आनंद झाला. पाहुण्यांनी बरोबर आणलेल्या पेपरमिंटच्या वड्या सर्व मुलांना वाटल्या व मुले घरी परतली.

दुसरे दिवसापासून आपापली कामे संपवून मुले डॉक्टरांना मदत करू लागली. आधीच मुलांना रानावनात फिरण्याची हौस! त्यातून एका मोठ्या डॉक्टराला आपण मदत करीत आहोत याबद्दल त्यांना उत्साह वाटू लागला. राजेश मॅग्निफाइंग ग्लासने कित्येक झुडपांचे निरीक्षण करीत असे व वहीमध्ये वेळोवेळी

त्यांच्या नोंदी करीत असे. पुष्कळशा वनस्पती किंवा रानटी फुले तो एका मोठ्या वहीमध्ये डकवून ठेवी. मुलांना हे सारे पाहून मोठे नवल वाटे.

एके दिवशी त्यांनी अभयगडावर जाण्याचे ठरविले. हा किल्ला खूप जुना असून आता फक्त त्याचे दोन बुरूज व काही पडके अवशेष शिल्लक राहिले होतें. किल्ल्यामध्ये जाण्याची गोष्ट निघाल्याबरोबर सर्वच मुले घाबरली. ती म्हणाली,

"डॉक्टरभाऊ आम्ही नाय बा येनार! तिथं भूतं वावरतात."

डॉक्टर खूप हसून म्हणाले,

"अरे, घाबरता काय असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळच्या या किल्ल्यामध्ये भूतांची कधी छाती होईल काय जायची? आपण असल्या भूतांना हुसकावून देऊ."

तरीसुद्धा किल्ल्यात जायचा बेत काही दिवस तहकूब करण्यात आला. गावातल्या लोकांकडे चौकशी केली तेव्हा राजेशला असें कळले की अमावास्येला किल्ल्याच्या बुरुजावरून प्रकाशाचे झोत दिसतात. काळोखात सायली नदीतून वल्ही मारल्याचा आवाज येतो. या सर्व गोष्टींमुळे लोक घाबरतात. म्हणून ते आपल्या मुलाबाळांना गुरं चारायलासुद्धा किल्ल्याच्या आसपास जाऊ देत नाहीत. या सर्व गोष्टी ऐकून डॉ. राजेश विचारमग्न झाले.

इकडे घेलाशेटने कर्ज फेडण्याचा जानोजीमागे पुन्हा लकडा लावला. 'कर्ज फेडायचं नसलं तर मला घर देऊन टाक.' असे तो त्याला एकसारखे सांगू लागला. जानोजी, सावकारावरचा सारा राग बायकोवर व संदूवर काढू लागला. पार्वतीने आपल्याला नकळत बरेच पैसे कुठेतरी दडवून ठेवले आहेत असा संशय त्याला येत होता.

शेवटी साऱ्या जाचाला कंटाळून पार्वती त्याला म्हणाली,

"तुमच्या आईनं मास्नी दिल्येला सोन्याचा ल्हानसा तावीत तेवडा हाय माज्यापाशी. तुमच्या आईला तो त्यांच्या सासूबाईनं दिला होता—आपल्या कुलामंदी अनेक पिढ्या त्या तावीताला जपूनशानी ठिवलं हाय. हवं तर घाला त्यो त्याच्या डोस्क्यावर!"

आईचं नाव ऐकून जानोजी पुन्हा काहीच बोलला नाही. कारण त्याची आईवर फार माया होती. थोड्या वेळाने भाकरी खाऊन तो बाहेर निघून गेला.

त्यानंतर दोन तीन दिवस सावकाराच्या मुनीमजीने जानोजी-च्या घरी येऊन पार्वतीला नाही नाही ते अपशब्द बोलून तिला नकोसा जीव करून टाकला. शेवटी मनाचा हिय्या करून पार्वती सावका-राच्या बायकोला भेटायला गेली. सावकार स्वभावाने निर्दय पण त्याची पत्नी मणिबेन अतिशय सालस स्वभावाची होती. कित्येक वर्षे त्यांना मुलबाळ नव्हते. पण चार वर्षापूर्वी ईश्वरकृपेने त्यांना एक मुलगा झाला. आपल्या नवऱ्याने गोरगरिबांना फसवून त्यांचा तळतळाट घेऊ नये असे तिला फार वाटत असे. पण घेला-शेटपुढे तिचे काहीच चालत नसे. पार्वतीची कर्मकहाणी ऐकून तिला फार वाईट वाटले. ती म्हणाली,

"पार्वती, माझ्या हातात काहीच नाही. पुरुषमाणसं आपल्या सारख्या बाईमाणसाचं कुठून ऐकायला बसलेत! तरी पण मी सांगून पाहीन."

लाचारीने पार्वती म्हणाली,

"बाई काय बी करा अन् आमचं घर तेवडं वाचवा. साव-कारानी घर घेतलं तर पोरंबाळं उघडी पडतील. आम्ही तुमचं सारं देणं फेडू—तसा खोटेपणा करनार नाय."

निराश मनाने पार्वती घरी परतली. तेव्हा संध्याकाळचे सात वाजले होते. सदू गुरांना घरोघर पोचवून घरी परतला होता. आईला घरी आलेली पाहून तो तिला म्हणाला,

"आई, मी आता जातो. गणू अंगणात खेळतोय् अन् सखूला मी नुकतीच पाळण्यात झोपवली आहे."

"थांब सदू, आज तू जाऊ नगस– मी सावकारणीला भेटून आलेय् पन फारसा काय बी उपेग व्हईल असं वाटत न्हाय. तो मुनीम मेला रोज येऊनशानी माजं डोकं खातोय. मी येक वस्तू तुज्याजवळ देते. ती घे नि सावकाराला नेऊन दे."

"कोणती वस्तू आई?"

"अरं, आपल्या कुळातला एक जुना सोन्याचा तावीत हाय माज्याजवळ! घरापेक्षा काय तो जास्त नाय! मातर सोन्याचं बरोबर वजन बग अन् किमत किती येईल ती पहा–" असे म्हणून एका जुनाट पेटीच्या तळाशी एका पत्र्याच्या डबीत ठेवलेला एक जुना सोन्याचा ताईत बाहेर काढला व तो सदूच्या हातात देताना तिला रडू आवरेना. तीं म्हणाली,

"सदू, हा तावीत कित्येक पिढ्या आपल्या कुळात आहे. आज मातर नाविलाजाने तो मी मोडायला देतेय्–"

"आई, मी हा तावीत मास्तरांकडे नेऊन देतो. ते प्रथम हा उघडून पाहतील. त्यांना याची किंमत पण बरोबर करता येईल. नाहीतर तो मारवाडी आपल्याला फसवील."

"हा रे हा! तसंच कर! मास्तर लई भला माणूस हाय." पार्वती म्हणाली.

सदू धावत मास्तरांच्या घरी गेला. मास्तर घरी नव्हते पण डॉ. राजेश होते. सदूने त्यांना एकीकडे घेऊन ताईताबद्दल

सर्व हकीगत सांगितली. परंपरेने आलेला तो ताईत केवळ लबा-डीने वाढविलेल्या कर्जाखातर मोडावा लागतोय् याबद्दल त्यांनाही वाईट वाटले. ते सदूला म्हणाले,

"कधी कधी जे काही घडते ते आपल्या बऱ्यासाठीच घडते. तेव्हा तू वाईट वाटून घेऊ नको." असे म्हणत त्यांनी तो ताईत सहज हलविला, त्याबरोबर आत काहीतरी असावे असे त्यांना वाटले. त्याबरोबर ते पुन्हा सदूला म्हणाले,

"सदू आपण हा ताईत इथं प्रथम उघडू या. पण नको. तू आपला तो तसाच त्या घेलाशेटकडे घेऊन जा. पण सांभाळ हो. नाहीतर ताईत जायचा व पैसे मिळायचे नाहीत."

"तुम्ही येता माझ्याबरोबर?" सदूने विचारले.

"मी आलो तर त्या मारवाड्याला उगाच संशय यायचा. तूच जा."

सदू घेलाशेटच्या पेढीवर पोचला तेव्हा ते ओटीवर लोडाशी टेकून बसले होते. जवळच एकमोठी पितळी समई तेवत होती. ते त्या उजेडात काही खतावणी तपासून पहात होते. सदूकडे पाहून त्यांनी विचारले,

"काय रे पोरा, आणलेयस काही कर्जाची फेड करायला?"

"होय शेट, हा एवढा सोन्याचा तावीत आणलाय्."

"हात्तिच्या! त्यात रे काय मला मिळणार! पाहू दे." असे म्हणून शेटजीने तो ताईत तपासून पाहिला– सोनं चांगलं शंभर नंबरी दिसत असून ताईत वजनदारही होता. पण उघडपणे समा-धान न दाखविता ते म्हणाले,

"याचं वजन काही फारसं नाही. पंचवीस तीस रुपये येतील–"

"वा शेटजी. मी हा ताईत गणपतशेठ सोनाराला दाखवून आणलाय्– एक तोळा वजन आहे याचे–" सदूने ठोकून दिले.

"अरे चोरा! बराच लबाड दिसतोस की–" असे म्हणत शेटजीनें तो ताईत उघडला. त्याबरोबर आतून एक कागदाची सुरळी बाहेर पडली– ती पलीकडे फेकून ते तुच्छतेने म्हणाले,

"पाहिलेस या सुरळीमुळं वजन जास्त वाढलं होतं."

सदूने ती कागदाची सुरळी उचलून खिशात टाकली. नंतर शेटजींनी त्या ताईताचे वजन करून त्याचे दीडशे रुपये येतील असे सांगितले तेव्हा सदू म्हणाला,

"ठीक आहे! पण कर्जातले दीडशे रुपये पोचले अशी रिसीट मला द्या."

चरफडत शेटजीनी तशी रिसीट दिली. सदू ती घेऊन घरी आला व त्याने आईला सर्व हकीगत सांगितली. त्याचा बाप अद्यापी घरी आला नव्हता. रिसीट आईजवळ नीट ठेवायला देऊन त्याने खिशातली ती कागदाचीं गुंडाळी बाहेर काढली व दिव्याजवळ जाऊन ती तो उलगडून पाहू लागला. त्यावर वेडयावाकडया अक्षरात काही मजकूर लिहिला होता. कागद फार जुना होता. सदू तो मजकूर वाचण्याचा प्रयत्न करू लागला. 'माजघरातल्या कोनाडयाजवळची खुंटी वाकवा' असे काहीतरी लिहिले होते. त्याला तो मजकूर वाचून आश्चर्य वाटले. त्यावर तो विचार करू लागला. ही चिठ्ठी डॉ. राजेशना दाखवून त्यांना याचा अर्थ विचारावा असे त्याने ठरविले. त्या रात्री सदूला नीट झोपही लागली नाही. कारण माजघरातल्या खुंटीबद्दल त्याच्या मनात सारखे विचार येत होते.

सकाळी लवकर उठून तो गुरापाठी गेला. संध्याकाळी परत

येत असताना डॉ. राजेश त्याला नदीकाठी भेटले. त्यांना पाहून त्याला फारच आनंद झाला. तो धावत त्यांच्याजवळ गेला व त्यांना घडलेली हकीगत सांगून ती गुंडाळी त्याने त्यांना दाखविली. त्यावरचा मजकूर वाचून त्यांनाही आश्चर्य वाटले. थोडासा विचार करून ते म्हणाले,

"हा कागद नाही. हे भूर्जपत्र आहे. पूर्वी लोक अशाच भूर्जपत्रांवर लिहीत असत. कारण तेव्हा कागद करण्याच्या पद्धतीचा शोध लागला नव्हता. पण काय रे सदू, हे घर खूप जुने आहे काय?"

"होय– माझ्या खापरपणजोबाने ते बांधले. आमच्या अंगणात एक भला मोठा नाग आहे. तो मी कधी पाहिला नाही पण आई सांगते. तो घराचा राखणदार आहे."

"अस्सं– मग तुमच्या घरात एखादं तळघर आहे काय रे–"

"मला काही ते माहीत नाही. असेल तर खूप मज्जा होईल नाही का? पण या कागदाचं काय?"

"हे बघ, उद्या तुझे वडील सकाळी बाहेर गेले की ते दुपारपर्यंत घरी येत नाहीत असे तू म्हणतोस ना मग मी त्यावेळी तुमच्याकडे येईन व मग पाहू या आपण या मजकूराचा काय अर्थ तो! पण तोपर्यंत कुणालाच काही सांगू नकोस."

सदूची गुरे पुष्कळ पुढे गेली म्हणून तो धावत त्यांच्यामागे गेला.

दुसरे दिवशी राजेश त्यांच्या घरी गेले. पार्वतीला एवढा मोठा डॉक्टर आपल्या गरिबाच्या घरी आल्याबद्दल खूप आनंद झाला. तिने त्यांचे स्वागत केले मग सदूने व राजेशने पार्वतीला आपल्या विश्वासात घेतले. राजेश माजघरातल्या कोनाड्यांकडे

लक्षपूर्वक पाहू लागला. त्या माजघरात चार कोनाडी होती. पण त्यापैकी फक्त एका कोनाड्याजवळच खुंटी होती. राजेशने ती खुंटी हलवून पाहिली पण काहीच झाले नाही. नंतर त्यांनी ती खाली खेचली. त्याबरोबर कोनाड्याखालच्या भिंतीचे चिरे एकदम बाजूला झाले व एक विवर दिसू लागले. ते पाहून पार्वती एकदम म्हणाली,


"अग बया ह्ये तर येक फडताळ हाय. माजी सासू मला सांगत असायची की घरामंदी कुटंतरी लपवलेलं तळघर हाये. ह्येच ते असनार!"

डॉ. राजेशने पुन्हा खुंटी वर खेचली. त्याबरोबर भिंतीचा तो भाग पुन्हा जागच्या जागी येऊन बसला. त्या फडताळात काय आहे हे बघण्याची सर्वांना उत्सुकता लागली. पण पार्वती म्हणाली,

"हे बगा, सद्याच्या खापरपणज्यानं बांधलेलं हे घर हाय. पहिल्यानं मी त्याची पूजा करते." असे म्हणून तिने फडताळासमोर एक तेलाची दिवली लावली. हळदकुंकू वाहून भाविकपणे नमस्कार केला व मग राजेशने पुन्हा फडताळ उघडले. त्यांच्या खिशात एक मोठा टॉर्च होता. तो लावून त्यांनी आत डोकावून पाहिले. फडताळ छोटेसेच होते. आत धुरळा साचला होता. व त्यात एक मध्यम आकाराचा पितळी डबा होता. पार्वतीने पुन्हा मनोभावाने नमस्कार करून तो डबा उचलून बाहेर काढला. मग फडताळ बंद करून तो डबा सदूला उघडायला सांगितला. त्याने तो उघडताच त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही, कारण आत थोडे सोन्याचे दागिने आणि जुन्या काळचे अस्सल चांदीचे रुपये होते.

पार्वती देवाला हात जोडून म्हणाली,

"देवा, तूच आम्हाला वाचवलंस अन् थोरल्या मामंजींनी अडीअडचणीसाठी ठेवून दिलेला हा ऐवज आमाला दिलास–"



"पार्वतीबाई, तुम्ही सदूला शाबासकी द्या. त्याला वाचायला येऊ लागलंय म्हणून त्याने तो कागद फेकून न देता वाचला. आता हा माल नीट संभाळून ठेवा. यातून सावकाराचे कर्ज फेडून तुमचे शेत व मळा आपण परत मिळवू. पण याच्या वडिलांना मात्र हे अगोदर काहीच सांगू नका. नाहीतर ते सर्व दारूपायी पुन्हा घालवून बसतील."

एका आठवड्यात विष्णूमास्तर व राजेश यांच्या मदतीने सदूने घेलाशेटचे सर्व कर्ज फेडून टाकले. त्यापूर्वी तालुक्यातील सरकारी कचेरीत सापडलेल्या वस्तूंची नोंद करावयास विष्णूमास्तर विसरले नाहीत. पण एकतर घरातल्या फडताळात घरा-

तलाच व मालकीचा जुना आणि तोही थोडासाच ऐवज होता व गरीबावर दया म्हणून त्याबद्दल सरकारी कचेरीतून काही हरकत घेण्यात आली नाही. शेत, मळा आणि ढवळ्यापवळ्याला घेला-शेटकडून सोडवून घेतल्यावर उरलेले दागिने व रुपये त्या माय-लेकरांनी पुन्हा फडताळात ठेऊन दिले. जानोजीला आता सर्व खरी हकीकत समजली. त्याला दारूपायी आपण वाडवडलार्जित सारं काही गहाण टाकल्याबद्दल पश्चात्ताप झाला. सदू शिकायला जातो याचा त्याला आत्ता अभिमान वाटू लागला. गावातल्या लोकांनाही आता साक्षरतेचे महत्त्व कळले व मास्तरांच्या वर्गातील मुलांची संख्या वाढली. एवढंच नव्हे तर काही मुलीपण मास्तरीण काकूंजवळ फावल्या वेळात येऊन अक्षरओळख करून घेऊ लागल्या.

* *

## ३. सदूचे श्रमदान

शिकायला येणाऱ्या मुलांची संख्या वाढली त्यामुळे मास्त-रांची जागा अपुरी पडू लागली. तेव्हा राजेश म्हणाले,

"मुलांनो, श्रमदान करून तुम्ही तुमच्यासाठी एक शाळेचा हॉल बांधा. मग सरकारकडून पैशाची वगैरे लागणारी मदत मी मिळविण्याचा प्रयत्न करीन."

हे ऐकून मुले आनंदाने टाळ्या वाजवू लागली. आपल्या गावात एक हॉल का होईना पण स्वतंत्र शाळा होणार ही कल्पना

त्यांना फार आवडली. इतक्यात सदूने विचारले,

"पण राजेशभाऊ, शाळेला जागा कुठं घ्यायची?"

"हात्तीच्या जागेला रे काय तोटा? आपण अभयगडाच्या जरा अलीकडे माळरान आहे, ती जागा साफसूफ करू या. त्या जागेवर काही कुणाची मालकी नाही." रघू म्हणाला.

रघू जेव्हा घरी गेला तेव्हा त्याचा बाप गणपतशेट सोनार त्याच्यावर खूप रागावला. तो म्हणाला,

"याद राख पोरा– जर का तुम्ही व्रात्य कार्टी त्या अभयगडाच्या आसपास लुडबुड करू लागलात तर तुझ्या पाठीची चामडी लोळवीन."

कर्ज फेडून शेतमळा सोडवून घेतल्यापासून घेलाशेट मारवाडी तर सदूवर सारखा जळत होता. तो, गणपतशेठ व गावातले आणखी दोनचार गावगुंड यांच्या अलीकडे काही मसलती होऊ लागल्या होत्या. पण सदू व त्याचे मित्र यांनी शाळेचे काम करण्याचे ठरविलेच होते.

सायली नदी बनगावापासून वाहत जाऊन अनेक मैलावर असलेल्या एका खाडीला मिळत होती. अभयगडाच्या जवळ तिच्या तीरावर बऱ्याच दरडी होत्या. त्यात पाण्याच्या जोराने गुंफा तयार झाल्या होत्या. कित्येक वेळा त्या गुंफातून रात्रीच्या वेळी धूर व जाळ निघालेला, जवळपासच्या गावी जाऊन उशीरा घरी परतणाऱ्या काही शेतकऱ्यांनी पाहिला होता. त्यामुळे अभयगड व नदीच्या दरडीजवळचा भाग भुतांनी भरलेला आहे असेच सर्वांना वाटत होते.

एके दिवशी सदू, दिनू आणि रघू आंबराईमध्ये फिरायला गेले –दिनू म्हणाला,

"सध्या गावात त्या दरडीजवळच्या भुतांमुळे एकच घबराहट निर्माण झाला आहे. आपण काही करू या का?"

"होय रे गड्या, आपण तिघांनी रात्री हळूच जाऊन तिथं चालणाऱ्या खऱ्या प्रकाराचा तपास लावू या." रघू उद्गारला.

"होय रे–हे सर्व खरं! पण भुतांनी आपल्याला झपाटलं तर–?" सदूने शंका काढली.

"अरें कसली भुतं घेऊन बसलास? यात काहीतरी काळबेरं असावं असं मला राजेशभाऊ सांगत होता. आपण त्याला बरोबर घेऊ या का? " दिनूने विचारले.

"नको, ते म्हणतात तसं काही गुन्ह्याचं प्रकरण असेल तर आपणच प्रथम शोध लावू आणि मग त्यांना सांगू." सदूने उत्तर दिले.

अमावास्येला अद्यापि अवकाश होता. त्याच दिवशी या मोहिमेवर निघण्याचे सदूने ठरविले व त्याप्रमाणे आपल्या मित्रांना त्याने सांगितले.

विष्णूमास्तरांची ओसरी शाळेला अपुरी पडू लागली. म्हणून श्रमदानाने हॉल बांधण्यापूर्वी आंबराईच्या अलीकडे मुलांनी एक मांडव तयार केला. त्यासाठी त्यांनी बेचांगळचा असलेल्या झाडाच्या जाड्या फांद्या डोंगरावर जाऊन तोडून आणल्या. मांडवावर काटक्यांची जाळी करून त्यावर पळसाच्या व सागाच्या पानांचे हिरवेगार आच्छादन तयार केले. मंडपातील माती चापून चोपून बसवली व शेणाने दोनचार दिवस सारवून गुळगुळीत जमीन तयार केली. मंडपाला झेंडूची फुले व आंब्याच्या पानांच्या माळा बांधल्या. एके दिवशी एका चांगल्या मुहूर्तावर संध्याकाळचा वर्ग तेथे उघडण्यात आला. राजेशभाऊंनी स्वतःच्या खर्चाने एक गॅसची

बत्ती दिली. मुलांना खाऊ वाटला व थाटात वर्गाचे उद्घाटन झाले. त्याच वेळी ज्या ज्या शेतकरी पालकांनी आपल्या मुलांना शाळेत यायला परवानगी दिली त्यांचा सत्कारही करण्यात आला.

त्या दिवशी सदूची ऐट तर काही विचारूच नका. नवे कपडे घालून तो थाटात इकडे तिकडे करीत होता. गावातल्या सज्जन लोकांनी मुलांचे कौतुक केले. पण घेलाशेटसारख्या अनेकांची तोंडे अगदी कडवट झाली.

या समारंभानंतर डॉ. राजेश एक–दोन वेळा तालुक्याच्या गावी जाऊन आले. ते जिल्हाधिकाऱ्यांनाही भेटले आणि बनगावच्या विकासाच्या बाबतीत त्यांनी त्यांच्याजवळ चर्चा केली. विष्णू-मास्तरांचे कार्य व त्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी एकवार बनगावला भेट देण्याचे ठरविले.

दहा–बारा दिवस मांडवातील वर्ग व्यवस्थित चालला होता. एके दिवशी संध्याकाळी मुले नेहमीप्रमाणे या शाळेत गेली. पहातात तो अर्ध्या छप्पराची कुणीतरी मोडतोड केलेली त्यांना दिसली. अर्थात् वर्ग सायंकाळी भरत असल्यामुळे उन्हाचा वगैरे त्रास होण्याचा संभव नव्हता. एकदा वर्गाची जमीनच कुणी उक-रून काढलेली आढळली. अशा रीतीने लहानसहान मार्गाने शिक्ष-णाच्या कार्यात अडथळे आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. कारण शेतकऱ्यांची मुले अडाणी राहिली की आपला कार्यभाग चांगल्या तऱ्हेने साधेल अशी कल्पना बनगावातील काही स्वार्थी मंडळींच्या मनात होती व जुन्या कल्पनांनाच चिकटून बसणारे काही शेत-करीही त्यांना सामील होते.

एके दिवशी सदू आपल्या दोस्तांना म्हणाला,

"दिनू, रघू, उद्या आपण अभयगड किल्ल्यात जाऊ या."

"बाप रे— पण तेथून दिसणारा तो उजेड?" दिनू घाबरून उद्गारला.

"आता का भागूबाई? परवा दरडीजवळच्या भुतांबद्दल मी बोलतो तर माझी टवाळी केलीस— अन् आता?" सदूने प्रश्न केला.

"ते काही नाही. आपण उद्या बघू या तर एकवार किल्ल्यात जाऊन! छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील तो इतिहास प्रसिद्ध किल्ला पहाण्याची मला लहानपणापासून इच्छा आहे. पण घरातली मंडळी जाऊ देत नाहीत पण केव्हा जायचं?" रघूने विचारले.

"मी तो सुर्व्यांचा लक्ष्या आहे ना त्याला उद्या माझ्या गुरांकडे पहायला सांगीन. सकाळी पहाटेच मी गुरं सोडून नेहमीप्रमाणे नेईन. लक्ष्याच्या हवाली गुरं करून मी तुम्हाला भेटेन. तुम्ही सहा वाजता मला नदीकाठी भेटा."

ठरल्याप्रमाणे ते तिघेजण सकाळी सहा वाजता सायली नदीच्या काठावर एकमेकांना भेटले. व अभयगडाकडे चालू लागले. त्यावेळी गडाच्या आसपासचा देखावा मोठा चित्तवेधक होता. रंगीबेरंगी पक्षी इकडून तिकडे उडत होते व गोड किलबिलाट करीत होते. वेगवेगळ्या रानफुलांचा संमिश्र सुगंध वाऱ्यावर तरंगत होता. नदीचे पात्र संथ दिसत असून मधून मधून छोट्या लाटा काठावरच्या खडकांना स्पर्श करीत होत्या. छोट्या छोट्या खारी या झाडावरून त्या झाडावर सरसर चढत उतरत होत्या. एकूण वातावरण खूप उत्साही होते. त्यामुळे त्या तिघा मित्रांना किल्ल्याकडे वाटचाल करायला खूप तरतरी वाटू लागली. शिवाय किल्ल्याच्या आतल्या भागाचे दर्शन घेण्याची उत्सुकताही त्यांच्या

मनात जागृत झाली होती.

अर्ध्या पाऊण तासात ते तिघे किल्ल्याच्या जवळ पोचले. बरीच वर्षे किल्ल्यामध्ये कुणी आले गेले नसल्यामुळे जंगली जनावरांची शंका त्यांच्या मनात येऊ लागली. पण कुतूहलाने भीतीवर मात केली व तें हळुहळू आत जाऊ लागले. प्रथम ते एका पडक्या बुरुजावर चढले. तेथे जिकडे तिकडे उंच गवत व खुरटी काटेरी झुडपे पसरली होती. मात्र बुरूजावरून आसपासचा देखावा अत्यंत सुंदर दिसत होता. पूर्वेकडे तांबडे फुटले होते. त्यातून सूर्यनारायण हळूच डोकावून पाहू लागला होता.


ते तिघेजण इकडे तिकडे फिरू लागले. किल्ल्याची जिकडे तिकडे पडझड झाली होती.पालापाचोळा सर्वत्र पसरला होता. त्यांना सापा किरडांची भीती वाटू लागली. पण सदूच्या हातात गुराख्याची खुळ् खुळ् वाजणारी काठी होती. तिचा तो मधुन मधून आवाज करीत होता. हळुहळू ते बुरुजाच्या मागच्या भागाकडे गेले– तिथून जुन्या काळातील दोन तीन पडझड झालेली दालने दिसत होती ती पाहून सदू उद्गारला,

"अरे, परवा मास्तरांनी आपल्याला इतिहासातील गोष्टी सांगितल्या होत्या ना, त्यात वर्णन केलेल्या किल्ल्यातील महालांप्रमाणे हे महाल असतील बघ."

"खरंच रे खरं! चला आपण पाहू या–"

ते तिघे हळुहळू तिकडे वळले. पहिल्या दालनात जिकडे तिकडे कचराच कचरा साठला होता. परंतु त्यात अनेक माणसांच्या पावलांच्या खुणा धुळीत दिसत होत्या. त्यावरून बरीच माणसे त्या किल्ल्यात येत जात असावी असा त्या तिघांनी कयास केला. व त्यांना आश्चर्य वाटले. हळुहळू ते दुसऱ्या दालनात गेले. ते

झाडून लख्ख केलेले दिसले. इतकेच नव्हे तर तेथे दोन-तीन चटया अंथरलेल्या असून टेकायला तक्केही होते. तेथे काही भांडी व



स्वयंपाकाचे सामान पडले होते. ते पाहून ती मुले आश्चर्यचकित झाली.

"एकूण इथं कुणीतरी मधुन मधून येते व राहते असे दिसते." सदू म्हणाला.

"ए, म्हणजे किल्ल्यातील भुतं माणसासारखी वावरतात तर." हसत हसत रघू म्हणाला.

नंतर ते इकडे तिकडे पाहू लागले. त्यांना भिंतीमध्ये एक दार दिसले. त्याला कुलूप लावले होते. या दारामागे काय असेल याचा ती मुले विचार करू लागली.

"अरे, आमच्या घरी फडताळ सापडलं तसं एखादं ऐतिहा-

सिक काळातलं भुयार असेल इथं."

"होय रे होय सदू, तू म्हणतोस तेच खरं आहे. ज्याअर्थी याला अलीकडचे कुलूप लावलेले आहे त्याअर्थी ह्या तळघरात कुणीतरी काही महत्त्वाचं ठेवलेलं असावं." दिनू म्हणाला.

"आपण कुलूप फोडू या का रे?" रघूने विचारले.

"वारे–शहाण्या! म्हणजे जर कुणी चोरटे इथ राहत असतील तर ते सावध होतील व एवढ्यात त्यांच्यापैकी कुणी इथं आलं तर आपली शंभर वर्ष भरलीच म्हणायची! चला आपण जाऊ या आणि हे सर्व डॉक्टरभाऊंना सांगू या." सदूने सल्ला दिला.

ते तिघे परत निघाले. किल्ल्यापासून बरेच दूर गेल्यावर त्यांना घेलाशेट व त्यांचा मुनीम येताना दृष्टीस पडले. त्या पोरांना त्या रस्त्यावर पाहून ते दोघे दचकले. मुनीमजीने त्यांना विचारले.

"काय रे व्रात्य कारट्यांनो, इकडे यावेळी तुम्ही कुठं?"

"का हो– हा सगळा भाग जणू तुमच्याच मालकीचा आहे होय? आम्ही कुठंही जाऊ शकतो." सदू हसत म्हणाला.

"त्या जान्याचा हा पोरटा फार चढेल झालाय. त्याला चांगला धडा शिकविला पाहिजे" शेटजी म्हणाले.

त्यावर तिन्ही मुले खो खो हसू लागली. त्यामुळे चिडून ते दोघे रस्ता चालू लागली.

वाटेत सदू आपल्या दोन्ही मित्रांना सोडून स्वतःच्या कामाला निघून गेला. व रघू आणि दिनू घरी गेले. घरी गेल्यावर डॉ. राजेशला एका बाजूला घेऊन दिनूने सर्व हकीगत त्यांना सांगितली. ते म्हणाले,

"वा! अगदी महत्त्वाची खबर तुम्ही मिळवली आहे. एकूण

अभयगडामध्ये काहीतरी रहस्यमय आहे असे वाटते. बघू आपण एखाद दिवशी. पण डॉ. राजेशला त्या दिवशी मुंबईहून एक महत्त्वाची तार आली व त्यांना आठ दिवसांसाठी ताबडतोब मुंबईला जावे लागले. त्यामुळे अभयगडासंबंधीची कारवाई तेवढ्या-वरच राहिली.

डॉ. राजेश मुंबईला गेल्याला दोन दिवस झाले. तिसऱ्या दिवशी विष्णूमास्तरांनी नेहमीप्रमाणे वर्ग घेतला. थोडासा अभ्यास झाल्यावर दर सोमवारी सद्वर्तनाचा तास असे. त्यावेळी मास्तर मुलांना उपदेशपर मार्गदर्शन करीत. मास्तर मुलांना म्हणाले,

"मुलांनो, तुम्ही स्वतंत्र भारताचे उद्याचे नागरिक आहात. तुम्ही शेतकऱ्यांच्या घरात जरी जन्माला आला असला तरी पुढे शिकून सवरून मोठे व्हाल व देशासाठी काही कामगिरी करू शकाल. एव्हापासून आपले चारित्र्य चांगले आकारावे याच्यासाठी प्रयत्न करा. कोणतेही चांगले काम करण्याची लाज वाटू देऊ नका. नेहमी दुसऱ्याच्या चांगल्यासाठी प्रयत्न करा. तसेच वडिल माणसं, ईश्वर व देश यांच्याबद्दल मनात श्रद्धा बाळगा. आपण दुसऱ्याचे वाईट केले नाही म्हणजे देवही आपले कधी वाईट करीत नाही."

"गुरुजी, तुम्ही सांगता तसेच आम्ही चांगले होण्याचा प्रयत्न करू." सर्व मुले एकसुरात म्हणाली. नंतर प्रार्थना झाल्यावर सर्व आपापल्या घरी गेले.

रात्री एकाच्या सुमारास 'आग आग' अशी ओरड ऐकून जानोजी, पार्वती व सदू यांना जाग आली. मास्तरांच्या घरची माणसे पण जागी झाली. दुरून आग दिसत होती. लाकडे पेटून कडकड आवाज येत होता. लवकरच ते छोटे खेडे जागे झाले.

सगळेजण आग लागलेल्या दिशेने धावत सुटले.

ती आग मुलांनी श्रमाने बांधून तयार केलेल्या शाळेच्या मंडपाला लागली होती. त्याच्यावर पाण्याच्या घागरी फेकण्याचा काही लोकांनी प्रयत्न केला पण त्याचा काहीच उपयोग होण्यासारखा नव्हता. कारण सर्वच लाकडांनी पेट घेतला होता व वाऱ्याने आग चेतली जात होती.

आपल्या शाळेचा मंडप जळताना पाहून सदू, दिनू, रघू आणि इतर मुलांना रडू आवरेना. ती हमसाहुमशी रडू लागली. विष्णूमास्तर त्यांच्याजवळ येऊन म्हणाले,

"बाळांनो, रडू नका. जे होतं ते आपल्या भल्यासाठीच होतं असा विश्वास मनात बाळगा. या आगीतूनच पुढं लवकरच तुम्हाला छानपैकी शाळेची इमारत मिळेल."

ती आग कुणीतरी आकसाने लावली होती, असे म्हणत लोक आपापल्या घरी परतले.

* *

## ४. सदूने लावलेला शोध

आठ दिवसांसाठी मुंबईला गेलेले डॉ. राजेश पंधरा दिवसानंतर बनगावला परत आले. त्यांना जेव्हा आगीची बातमी कळली तेव्हा त्यांनाही फार वाईट वाटले. मुलांच्या उत्साहावर असे विरजण घालणाऱ्या दुष्ट लोकांची त्यांना फार चीड आली.

सदूला या बाबतीत घेलाशेटचा संशय येत होता. पण तो त्यांनी फक्त आपल्या मित्रांजवळ बोलून दाखविला. जानोजी आता खूपच निवळला होता. अमावास्येला नदीच्या दरडीवर मुलांचा बेत मात्र कायम होता. पण आगीच्या गडबडीत एक अमावास्या तशीच निघून गेली होती.

गावातल्या तुकाराम गुरवाचा एकुलता एक मुलगा गजानन तापाने आजारी पडला. दहा दिवस झाले तरी ताप हटेना. गजा रघू-सदूचा मित्र होता. तोही मास्तरांच्या साक्षरतेच्या वर्गात येत असे. त्यामुळे मित्राच्या आजाराने सारी मुले हवालदिल झाली. तुकाराम व त्याची बायको तर घाबरून गेली. 'देवाने एकच पोर दिलंय. आता त्याचं काय होतंय.' या विचाराने त्यांना काही सुचेना.

अंगारे धुपारे झाले. गावातल्या वैद्याचे औषध देऊन पाहिले परंतु काहीच उपाय चालेना. शेवटी एक देव खेळविणारा बोलविला. त्याने तापाने बेशुद्ध असलेल्या बिचाऱ्या गजाननाचे आणखीनच हाल केले. त्याला पाल्यापाचोळ्याचा धूर दिला. त्याच्यासमोर दोन कोंबडी मारली. 'भुताने झपाटलंय्' म्हणून लिंबाच्या डहाळीने त्याला सपासप मारले. शुद्धीवर येण्याऐवजी या देवदेवस्कीने गजा अगदीच निपचित पडला.

तेवढ्यात विष्णूमास्तर आणि डॉ. राजेश तेथे आले. हा सर्व प्रकार पाहून राजेश भयंकर चिडला. तो ओरडून मांत्रिकाला म्हणाला,

"बुवा, इथून चालते व्हा–या मुलाचा जीव घ्यायचा आहे काय–"

बुवा रागारागाने बाहेर जात म्हणाले,

"माझ्यासारख्या भगताचा अपमान केलात. मुलाचा जीव

धोक्यात येईल–"

त्याबरोबर तुकाराम धावत गेला. त्यांचे पाय धरून त्यांची क्षमा मागू लागला–हातातील शेंदूर व लिंबे अंगणात फेकून बुवा तावातावाने तेथून निघून गेले. बिचारी गजाची आई रडू लागली. तुकाराम घाबरून म्हणाला,

"मास्तर, तुमच्या पाव्हन्यानं सारं काम बिगडवलं. आता माजं पोर वाचत नाय."

त्याला समजावीत मास्तर म्हणाले,

"तुकाराम, वेडा तर नाहीस तू! हा माझा भाचा डॉक्टर आहे. तू आता गजाला त्याच्यावर सोपव. तो त्याला बरं करील."

"हे बघ तुकाराम, तुझ्या मुलाला टायफॉईड म्हणजे विषमज्वर झालाय्. ताप फार वाढल्यामुळे तो शुद्धीवर नाही. तू काळजी करू नकोस. मी त्याला बरं करीन." असे म्हणून डॉ. राजेशनी गजाननाला तपासले. सुदैवाने त्याच्या छातीमध्ये कफ झाला नव्हता. त्यांनी बॅगेतून सिरिंज काढून गजाननाला एक इंजेक्शन दिले. नंतर कोलनवॉटरची घडी त्याच्या कपाळावर ठेवली. टायफॉईडवर निघालेल्या गोळ्यांपैकी एकीची पावडर करून ती पाण्यातून चमच्याने गजाननाला हळुहळू पाजली. त्या रात्रभर डॉ. राजेश गजाननाजवळ बसून राहिले.

पहाटे गजाननला थोडी शुद्ध आली. त्याला थोडासा घामही आला व त्याच्या तापाचे प्रमाण खालावले. अशा रीतीने आठ दहा दिवसात गजाननचा ताप गेला. त्याला अशक्तपणा फार आला होता परंतु खाण्यापिण्याच्या बाबतीत डॉक्टर भाऊंनी दिलेल्या सूचना तुकारामने पाळल्या. त्यामुळे गजानन पूर्ववत् साफ बरा झाला.

गजानन बरा झाल्यावर मास्तरांनी गावकऱ्यांची एक सभा चावडीवर घेतली. त्यावेळी सरपंचही हजर होते. या सभेत सदूने फारच छान भाषण केले. तो म्हणाला,

"गावकऱ्यांनो, देवी, गोवर, विषमज्वर अशा रोगांचे जंतू असतात. ते अंगात गेले की माणूस आजारी पडतो. आपण भोळेपणाने देवदेवस्की करून रोग्याला जास्त हैराण करतो. आता कोणताही असाध्य रोग बरा करण्याची औषधे शोधून काढली आहेत. पण आपण आपला अज्ञानीपणा व भोळसर समजूत दूर केली पाहिजे."

लोकांनी टाळ्या वाजविल्या. एक वृद्ध शेतकरी त्याच्या शेजारी बसलेल्या दुसऱ्या शेतकऱ्याला म्हणाला,

"अरच्चा ! हा जान्या पाटलाचा ल्योक पोपटावानी बोलतो जनू !"

"अरं तो अन् गावातली समदी प्वारं आता लिवायला वाचायला शिकल्यात नव्हं का ? उगाच शानपन येतय् व्हय !"

मग डॉ. राजेशनेही सर्वांना स्वच्छता व आरोग्य यांचे महत्त्व समजावून दिले. त्या दिवसापासून अनेक शेतकरी आजारी माणसांसाठी त्याच्याकडून औषधे घेऊ लागले. छोट्या मुलांना देवीची लसही डॉ. राजेशने टोचायला सुरुवात केली. कारण पावसाळ्याच्या सुमारास बनगावात नेहमी देवीची साथ पसरायची. या कामी सदूने त्यांना खूप मदत केली.

अमावास्येचा दिवस उगवला. त्या रात्री सायली नदीच्या दरडीजवळील धुराचे रहस्य शोधण्यासाठी सदूने जायचे ठरविले. रघू आणि दिनूही त्याच्याबरोबर जाणार होते. ठरल्याप्रमाणे घरातल्या कुणालाही काही न कळविता ती तीन मुले नदीच्या

दरडीकडे जावयास निघाली. त्यांनी बरोबर काठ्या व दिनूचा एक छोटा टॉर्च घेतला होता.

अमावास्येचा दिवस असल्यामुळे अंधार अतिशय होता. रातकिड्यांची किर्रकिर्र सारखी ऐकू येत होती. पालापाचोळा सळसळत होता. ती मुले जीव मुठीत घेऊन दरडीकडे चालली होती. रस्त्यावर चिटपाखरूही आढळले नाही. दरडीच्या अलीकडे काही अंतरावर ती थांबली व दरडीच्या खाली असणाऱ्या गुंफांकडे पाहू लागली. तेथे थोडा जाळ व धूर दिसत होता. कुणीतरी कंदीलही लावला होता.

"आपण आता फार पुढं न जाता या मोठ्या दगडावर चढून बसू. तिथून गुंफा बरोबर दिसते." सदू म्हणाला.

"मला बाबा भारी भीती वाटते." थरथर कापत रघू म्हणाला.

"चूप रे--भित्री भागुबाई ! मग आलास कशाला ?" रागाने दिनूने विचारले.

"ए, मोठ्यानं आवाज करू नका. तिथं बरीच माणसं आहेत. त्यांनी आपल्याला पाहिलं तर खांडोळी करतील आपली." सदूने त्यांना धोक्याची सूचना दिली.

त्या दिवशी डॉ. राजेश गावात नव्हते. ते काही कामासाठी बाहेरगावी गेले होते. त्यामुळे मुलांना घराबाहेर गुपचूप पडता आले होते.


काही वेळाने 'डुबुक् डुबुक्' असा वल्ह्याचा आवाज दुरून ऐकू येऊ लागला, त्याबरोबर अभयगडाच्या बुरुजावरून प्रकाश-झोत बाहेर पडू लागले. आश्चर्यचकित होऊन मुले या प्रकाराकडे पहातच राहिली. लवकरच दोन होड्या दरडीजवळ येऊन थांबल्या. त्यातून दहाबारा लोक खाली उतरले. त्यांच्या पाठीवर सामानाने

भरलेल्या पिशव्या होत्या. गुंफेतील माणसांनी त्यांना गुंफेतून बऱ्याचशा बाटल्या दिल्या –त्या पाहून सदू उद्‌गारला,

"अरेच्चा, या तर दारूच्या बाटल्या ! म्हणजे त्या गुंफेत हातभट्टीची दारू तयार करतात असं दिसतं."

"आणि आपल्या गावातील कित्येक आठ नऊ वर्षांची पोरं अशा बाटल्या घेऊन कुणाकुणाच्या घरी नेऊन देताना मी पाहिली आहेत. पण मला काही ठाऊक नव्हतं की त्या दारूच्या बाटल्या असतील." रघू म्हणाला.

बोटीतल्या लोकांनी आणलेल्या पिशव्या घेऊन गुंफेतील लोक दरड चढून वर येऊ लागले. तोपर्यंत बोटीचे खलाशी गुंफेत पेटविलेल्या शेकोटीजवळ बसून दारू पिऊ लागले.



एवढ्यात एक चमत्कार घडला. एकाएकी पोलिसांची एक

व्हॅन मोठमोठ्याने आवाज करीत वेगाने तेथे येऊन धडकली. भराभर पोलिसांनी उड्या मारल्या. दरड चढून येणारांना त्यांनी त्यांच्या हातातील पिशव्यांसह पकडले. काही पोलीस धावत दरडीवरून उड्या मारून दारू पिणाऱ्या खलाशांजवळ गेले व त्यांना पकडून त्यांनी सर्व दारू ताब्यात घेतली.

चोरट्यांना पकडलेलें पाहून सदू व त्याचे मित्र दगडावरून खाली उतरले. त्यांच्याकडे एका पोलीस ऑफिसरचे लक्ष गेले व तो एकदम म्हणाला,

"कोण सदू, दिनू ? तुम्ही इथं काय करीत होता ?"

"अरेच्चा–हे तर आपलें राजेशभाऊ !" रघू चकित होऊन आनंदाने उद्गारला.

"आम्ही दरडीजवळून निघणाऱ्या धुराचा आणि किल्ल्यावर रात्री दिसणाऱ्या प्रकाशाचा शोध लावण्यासाठी आलो होतो. किल्ल्यातल्या रहस्यमय खोलीबद्दल आम्ही तुम्हाला सांगितले होतेच."

"सदू, तुमच्यासारख्या लहान मुलांनी या बदमाषांच्या हालचाली पहाण्यासाठी असं एकटं दुकटं येणं बरं नाही. आम्ही आलो म्हणून बरं झालं. तुमच्या जीवाला काही अपाय झाला असता म्हणजे ?" नंतर गाडीतील एका दुसऱ्या ऑफिसरना हाक मारून राजेश म्हणाले,

"सर, हा सदू. या बनगावातला एक अतिशय हुशार व शहाणा मुलगा आहे. त्याने आपल्या मित्रांच्या सहाय्याने किल्ल्यातले रहस्य शोधून काढले. म्हणूनच आपल्याला ही चोरट्या सोन्याची आयात निर्यात करणारी बदमाषांची टोळी पकडता आली."

ते ऑफिसर म्हणजे पोलीस कमिशनर होते. त्यांनी सदूची

व त्याच्या मित्रांची पाठ थोपटली. चोरट्या सोन्याची खरेदी करणारांमध्ये घेलाशेटचा मुनीम व गणपतशेट सोनार सापडले. त्यांना योग्य ती सजा झाली. या कृत्याचे मूळ सूत्रधार घेलाशेट मात्र कसेतरी सुटले. कारण त्यांचे नाव कुणीच सांगू शकले नाही. किल्ल्याच्या त्या कुलूप लावलेल्या दारामागे एक तळघर असून त्यात पुष्कळ सोने व इतर विलायती माल दडवून ठेवलेला आढळला.

डॉ. राजेश हे डॉक्टर तर होतेच. पण पोलीस खात्याला अशा प्रकारच्या गुन्ह्याचा शोध लावण्याच्या कामी सरकारने त्यांची नेमणूक केली होती. बनगावच्या नदीच्या मार्गाने काही तरी बेकायदा व्यापार चालतो अशी बातमी पोलीसखात्याला मिळाली होती. बनगावला राजेशांचे मामा विष्णूमास्तर राहत होते. त्यामुळे वनस्पती संशोधन करण्याच्या निमित्ताने ते बनगावला येऊन राहिले होते.

गुन्हा शोधून काढण्याच्या बाबतीत सरकारला साहाय्य केल्याबद्दल सदूला एक हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले. त्याच्या दोन्ही मित्रांनाही छोटी बक्षिसे मिळाली. बनगावसारख्या छोट्या गावातल्या आपल्या एका शेतकरी बंधूच्या मुलाची ती कर्तबगारी पाहून गावकरी खूष झाले. त्यांनी सदूचा सत्कार घडवून आणला. आता किल्ल्यावरील व दरडीजवळील भुतांबद्दल त्यांच्या कल्पना बदलल्या.

* *

# ९. वृक्षवल्ली आम्हा, सोयरी वनचरे

अभयगडच्या आणि दरडीमधल्या भुताखेताच्या गावात पसरलेल्या भोळ्या समजुती डॉ. राजेश आणि सदू व त्याचे मित्र यांच्यामुळे नाहीशा झाल्या. ज्या खास कामासाठी डॉ. राजेश वनगावामध्ये येऊन राहिले होते. ते यशस्वी झाल्यामुळे ते परत जावयास निघाले. त्यांच्याबरोबर तालुक्याच्या गावातील हायस्कूलमध्ये जाण्यासाठी मास्तरांचा दिनूही जाणार होता. डॉक्टरांचा सर्व मुलांना विशेषत: सदूला फारच लळा लागला होता. त्यामुळे त्याला ते परत जात आहेत हे पाहून रडू कोसळले. तेव्हा डॉक्टर राजेश त्याला जवळ घेऊन म्हणाले,

"वेड्या माझे मामाच इथं राहताहेत. मी मधुन मधून इथं येईनच. शिवाय आता पुढच्या वर्षीपासून तुलाही तालुक्याच्या गावी इंग्रजी शाळेच्या परीक्षेस मास्तर बसविणारच आहेत. मग तर आपण नेहमी भेटूच—तुझ्यासारख्या हुशार मुलाचा भविष्य-काळ फारच उज्ज्वल आहे बघ. नीट रहा व अभ्यास करायचा सोडू नको. या नव्या युगामध्ये प्रत्येकाला शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

डॉक्टर व दिनू गावाला गेल्यावर रघू आणि सदू यांना चैन पडेना. पावसाळा जवळ आला होता शाळेचा मंडप आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे वर्ग पुन्हा मास्तरांच्या घरीच भरू लागला. शेतकऱ्यांच्या मुलांनाही अघोटीची कामे करावी लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्याही रोडावली. त्यामुळे शाळा बांधून केव्हा

तयार होईल याबद्दल रात्रंदिवस रघू व सदू विचार करू लागले. अर्थात् माळरानावर एखादा हॉल बांधणे आता शक्य होते कारण खोटी भुताटकी नाहीशी झाली असून गावातील दुर्जन लोकांना आता धास्ती बसली होती. त्यामुळे माळरानावर शाळा बांधण्याच्या कामात व्यत्यय येणार नव्हता, तथापि पावसाळा तोंडावर येऊन ठेपला होता त्यामुळे काम चार महिन्यानंतरच करणे शक्य होते.

सदूचा धाकटा भाऊ आता गुरांमागे जाऊ लागला होता. व सदू, पार्वती आणि जानोजी शेतामध्ये आणि मळ्यात काम करीत. फावल्या वेळात सदू आपल्या धाकट्या भावालाही अक्षर ओळख करून देऊ लागला. बनगावातील सारी शेतकरी मंडळी राब व नांगरणी करण्यात गढून गेली होती.

एके दिवशी मास्तर सदूला म्हणाले,

"सदू, आजच मला राजेशचे पत्र आले आहे. जिल्हा परिषदेकडून आपल्या गावात शाळेसाठी अेक लहानशी बैठी इमारत बांधण्याला मदत मिळविण्याची तो खटपट करीत आहे. तथापि गावकऱ्यांनीही तशा अर्थाचा अेक अर्ज त्यांच्याकडे पाठविला पाहिजे. मी तो तुला लिहून देईन. तू गावकऱ्यांच्या सह्या व ज्यांना लिहिता येत नाही, त्यांचे अंगठे जास्तच जास्त मिळव."

सदू व रघू यांनी ही कामगिरी मोठ्या आनंदाने अंगावर घेतली. अनेकांनी सह्या किंवा अंगठे दिले. मुलें घेलाशेटकडे गेली तेव्हा ते रागाने ओरडून म्हणाले,

"चालते व्हा इथून! म्हणे शाळा बांधायची. तुम्हा लोकांना करायचंय् काय शिकून? आपल्या बापजाद्यांनी केलेले धंदे नीट करा. मी मुळीच सही देणार नाही."

"नका देऊ–तुमची इच्छा! पण एक गोष्ट ध्यानात ठेवा शाळा बांधली जाणारच! तुमच्या मुलाला नाही का त्याचा उपयोग व्हायचा?"

"अरे जा रे पोरांनो! माझ्या दामजीभाईची तुम्हाला नको काळजी–व्हा चालतें."

अशी एक दोन ठिकाणी निराशा झाली तरी सदू डगमगला नाही. दोनचार दिवसात अनेक सह्या व अंगठे मिळवून त्यांनी अर्ज मास्तरांकडे नेऊन दिला. मास्तरांनी तो राजेशकडे पाठवून दिला.

बेकायदेशीर रीतीने जंगलातील किंवा बनगावातील भोळसर शेतकऱ्यांना फसवून त्यांच्या मालकीची झाडे तोडून लाकडाचा व्यापार करणारा एक एजंट नेहमी घेलाशेटकडे येत असे व घेलाशेट स्वत:चे कमिशन घेऊन त्याला मदत करीत. जानोजी कर्जमुक्त झाल्याबद्दल शेटजींच्या मनात त्याच्याविषयीचा राग पूर्णपणे गेला नव्हता. जानोजीच्या मळ्यामध्ये एक डेरेदार वडाचे व एक सागाचे उंच झाड होते या दोन झाडांवर एजंटाचा डोळा होता. तेव्हा जानोजीला बनविण्याचे काम त्याने शेटजींवर सोपविले.

जानोजीच्या मळ्यातले वडाचे झाड बनगावातील सर्व स्त्रियांचे व मुलींचे अतिशय आवडते होते. जेष्ठ महिन्यात वटसावित्रीची पूजा करायला गावातल्या साऱ्या वृद्ध व नवीन लग्न झालेल्या सुवासिनी जमायच्या. वडाला दोरे गुंडाळून व हळदकुंकू, आंबे, फुले वाहून त्या मनोभावे वडाची प्रार्थना करून अखंड सौभाग्याचा आशीर्वाद मागायच्या. यावेळी पार्वतीही नटून थटून सगळ्यांची उठबस करायची. वटसावित्रीचे गाणे गायला विष्णूमास्तरांची पत्नी यायची. जातिभेद विसरून साऱ्या सुवासिनी

फुगडया , झिम्मा वगैरे खेळायच्या व हळदीकुंकवाची व वाणाची देवघेव करायच्या.

वटपौर्णिमेप्रमाणेच श्रावण महिन्यातही नागपंचमीच्या दिवशी नववधू व कुमारिका या वडाखाली एकत्रित जमून फेर धरून गाणी गायच्या. ती मौज पहाण्यासाठी त्या छोटया गावातील लहानथोर मंडळी जमत असत. अशा तऱ्हेने स्त्रीवर्गामध्ये अत्यंत प्रिय असलेल्या त्या झाडावर एजंटाची लोभी नजर पडली होती.

एके दिवशी जानोर्जा मळयातल्या विहिरीवर मोट चालवून भाजीपाल्याच्या रोपटयांना पाणी घालीत होता, तेवढयात एजंटाला घेऊन घेलाशेट तेथे आले व मानभावीपणे म्हणाले,

"जानोजी, तुझ्या कर्जाची फेड होऊन मळा पुन्हा तुझ्या हातात आला, हे बरं झालं. अरे आम्हाला तरी तुम्हा गरिबांचे शेत–मळे ताब्यात घ्यायला काय आनंद वाटतो थोडाच ! पण व्यवहाराला धरून वागावंच लागतं."

जानोजी तसा भाबडया स्वभावाचा होता. तो म्हणाला,

"व्हय शेटसाब, व्येव्हार पाळलाच पायजे. तुमी पन आमच्या अडिअडचणी बगता."

"हे बघ जानोजी, तुझ्या हिताची एक गोष्ट सांगायला मी यांना आणलंय्. यांचं नाव सापळे ! ओळखतोस यांना तू ?"

"व्हय जी ! लाकडाचा व्यापार करतात जनू !"

"होय बरोबर आहे. अरे तुझ्या मळयातलं ते वडाचं झाड आणि सागाचं झाड यांना देऊन टाक. या झाडांची गर्दी कमी केलीस तर तुला आणखी भाजीपाला लावता येईल. यांच्या छाये-मुळे भाजीपाल्याच्या रोपटयावर वाईट परिणाम होतो. चांगले पैसे देतील तुला हे."

फुगड्या, झिम्मा वगैरे खेळायच्या व हळदीकुंकवाची व वाणाची देवघेव करायच्या.

वटपौर्णिमेप्रमाणेच श्रावण महिन्यातही नागपंचमीच्या दिवशी नववधू व कुमारिका या वडाखाली एकत्रित जमून फेर धरून गाणी गायच्या. ती मौज पहाण्यासाठी त्या छोटया गावातील लहानथोर मंडळी जमत असत. अशा तऱ्हेने स्त्रीवर्गामध्ये अत्यंत प्रिय असेलेल्या त्या झाडावर एजंटाची लोभी नजर पडली होती.

एके दिवशी जानोर्जा मळयातल्या विहिरीवर मोट चालवून भाजीपाल्याच्या रोपटयांना पाणी घालीत होता, तेवढयात एजंटाला घेऊन घेलाशेट तेथे आले व मानभावीपणे म्हणाले,

"जानोजी, तुझ्या कर्जाची फेड होऊन मळा पुन्हा तुझ्या हातात आला, हे बरं झालं. अरे आम्हाला तरी तुम्हा गरिबांचे शेत–मळे ताब्यात घ्यायला काय आनंद वाटतो थोडाच! पण व्यवहाराला धरून वागावंच लागतं."

जानोजी तसा भाबडया स्वभावाचा होता. तो म्हणाला,

"व्हय शेटसाब, व्येव्हार पाळलाच पायजे. तुमी पन आमच्या अडिअडचणी बगता."

"हे बघ जानोजी, तुझ्या हिताची एक गोष्ट सांगायला मी यांना आणलंय्. यांचं नाव सापळे! ओळखतोस यांना तू?"

"व्हय जी! लाकडाचा व्यापार करतात जनू!"

"होय बरोबर आहे. अरे तुझ्या मळयातलं ते वडाचं झाड आणि सागाचं झाड यांना देऊन टाक. या झाडांची गर्दी कमी केलीस तर तुला आणखी भाजीपाला लावता येईल. यांच्या छाये-मुळे भाजीपाल्याच्या रोपटयावर वाईट परिणाम होतो. चांगले पैसे देतील तुला हे."

"हो–दोन वीसा देईन या दोन झाडांचे!"

"असं म्हनता?–पन दोन इसाच फक्त!"

"अरे बाबा, वडाचं लाकूड तसं काय उपयोगाचं नसतं. त्याला भाव येत नाही. त्या सागाचा थोडाबहुत उपयोग होईल." सापळे म्हणाला.

"मग काय विचार आहे तुझा?" शेटजीने प्रश्न केला.

"बगू–घरी पारू अन् सदूला इचारून सांगीन." जानोजी म्हणाला. अलीकडे तो फार निवळला होता. सदूच्या शहाणपणाचा त्याला अभिमान वाटू लागला होता.

"अहा रे भेकडा! बाईमाणसाला व्यवहारात काय विचारायचं? अन् सदू काय सांगणार कपाळ? शेंबडं पोर ते!" शेटजी उद्गारले.

"ते काही नाही. हे वीस रुपये इसारा म्हणून घे. ठरलेल्या किमतीपेक्षा दहा रुपये जास्त देईन." असे म्हणत सापळे जानोजींच्या हातात दहाच्या दोन नोटा बळेच कोंबू लागला.

पण जानोजीने त्या घेतल्या नाहीत. एक महिन्याने सौद्याचे पाहू असें त्याने उत्तर दिले.

रात्री जेवताना जानोजीने घडलेली हकीकत पार्वतीला व सदूला सांगितली. ती ऐकून त्या दोघांना फार वाईट वाटले. पार्वती म्हणाली,

"धनी, वाडवडिलांनी लावलेली झाडं अशी तोरू नकासा. गावच्या साऱ्या सवास्नी पूजेला येतात. तिथं असं पाप करायचं न्हाय."

"बाबा, तो मारवाडी फार लबाड आहे. तुम्हाला त्यानं किती फसवलं होतं, आता पुन्हा त्याच्या जाळ्यात सापडू नका."

सदू म्हणाला.

जानोजीला बायकोचे व सदूचे म्हणणे पटले खरे, पण सापळेने देऊ केलेल्या पन्नास रुपयांचा मोहही त्याला आवरत नव्हता. सध्यातर सौदा केलेला नाही. पुढचं पुढे पाहू." असा विचार करून त्याने घोंगडीवर अंग टाकले.

वैशाख महिना संपत आला होता. आकाश मधुन मधून ढगाळू लागले. "मळभ येतंय् तेव्हा पाऊस लवकर पडणार असे बनगावातली वृद्ध स्त्रीपुरुष मंडळी म्हणू लागली. सदूची बहीण तान्हुबाईला सायली नदीच्या पलीकडे असलेल्या गावी दिली होती. तिला नुकताच मुलगा झाला होता. त्याला पहायला जानोजी जायला निघाला. त्याचा धाकटा मुलगा पण त्याच्याबरोबर जाणार होता. पार्वतीने गरिबीचेच काही गोडाधोडाचे पदार्थ व मळ्यातली भाजी तान्हुबाईच्या सासरी द्यायला त्यांच्याबरोबर बांधून दिली. तेथे दोन दिवस राहून जानोजी परतणार होता.

ज्या दिवशी तो लेकीच्या गावी गेला त्या दिवशी एकाएकी आकाश फारच ढगाळले. सोसाट्याचा वारा वाहू लागला. पालापाचोळा आणि माती सर्वत्र उडू लागली. झाडे गदगदा हलू लागली. काहींच्या झोपड्यांवरची छपरे उडू लागली. सायली नदीच्या पाण्याचा वेगही एकाएकी वाढला. ते पाणीही गढूळ दिसू लागले. बनगावातील सारी मंडळी घाबरली. कारण काही म्हातारी माणसं म्हणू लागली की, "नदीला पूर येण्याची लक्षणं दिसताहेत." सायली नदीला गेल्या कित्येक वर्षात पूर आला नव्हता.

एकाएकी मुसळधार पावसाला सुरुवात झाली. गुराख्यांनी आपली गुरे कशीबशी घरोघर नेऊन पोचविली. पावसाच्या जोरामुळे नदीचे पाणी खळखळाट करीत वाहू लागले. लवकरच

ते फुंफाटत घाटाची मर्यादा ओलांडू लागले.

गावातील लहानथोर मंडळीं नदीकाठी पावसात भिजत चढणारे पाणी पहावयास जमली. पण पाणी जसजसे पुढे येऊ लागले, तसतशी बघणारांची गर्दी पांगली. पार्वती अगदी घाबरून गेली. सदू तिला धीर देऊ लागला. गावातल्या खोलगट भागातल्या झोपड्यातून पाणी शिरू लागले.

सदू व रघू यांनी त्यांच्या वयाच्या मुलांचे एक पथक तयार केले व पुरात सापडलेल्यांना ते सुखरूपपणे उंचवटयावर नेऊन पोचवू लागले. म्हाताऱ्याकोताऱ्या माणसांना, मुलांना आणि गुरावासरांना त्यांनी अभयगडावरील दालनात नेऊन पोचविण्याचा प्रयत्न केला, सारीजण गावदेवीची प्रार्थना करू लागली.

आता पावसाचा जोर कमी होऊ लागला. काही लोकांना किल्ल्यात पोचवून सदू घरी परतत होता. इतक्यात साचलेल्या पाण्यात त्याला एक छोटा मुलगा गटांगळ्या खाताना दिसला. सदूने ताबडतोब त्याच्याकडे धाव घेतली व पोहत त्याच्या जवळ जाऊन त्याला पाठीवर घेऊन तो कसाबसा उथळ पाण्यावर आला. ही जागा त्यांच्या मळ्याजवळच होती. त्या मुलाला घेऊन सदू झपाझप मळ्यातील वडाच्या झाडावर चढला व टोकावरच्या दोन जाड फांद्यांच्या बेचकीत त्याला घेऊन बसला. तो मुलगा घाबरून बेशुद्ध झाला होता. पुस्तकात वाचल्याप्रमाणे सदूने त्याला ऊब आणण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्याच्या पोटात पाणी शिरले नव्हते.

सदूने सहज त्या मुलाच्या तोंडाकडे पाहिले. तो त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण तो घेलाशेट सावकाराचा नवससायासाने झालेला एकुलता एक मुलगा होता. सदू मनात म्हणाला,

"देवा, मला अपकाराची फेड उपकाराने करून देण्याची संधी आणून दिलीस याबद्दल मी तुझा आभारी आहे."

मुलाला पोटाशी धरून सदू पुष्कळ वेळ झाडावर बसून राहिला. देवाच्या कृपेने अकस्मात् गावात शिरू लागलेले सायली नदीचे पाणी मागे जाऊ लागले. पाऊसही थांबला आणि सायलीने धारण केलेले रौद्र रूप पुन्हा सौम्य झाले. लोकांच्या जीवात जीव आला.

पण इकडे सावकाराच्या घरी एकच हाहाःकार उडाला होता. सावकारीण मोठमोठ्याने रडत होती. घेलाशेट इकडून तिकडे धावपळ करून आपल्या मुलाचा शोध करीत होता. मुलगा पुरामध्ये वाहत गेला असेच आता सर्वांना वाटू लागले होते. तरीं-सुद्धा सर्व मंडळी शोध करीतच होती. त्यांच्याबरोबर पार्वतीही होती. तिला आता सदूचीही काळजी लागली होती. कारण तो व त्याचे पथक लोकांना मदत करण्यासाठी दिवसभर धावपळ करीत होते. तो अद्यापि घरी आला नव्हता.

आता संध्याकाळ झाली होती. घेलाशेटच्या मुलाला शोधत शोधत हातात कंदील व काठ्या घेतलेली मंडळी जानोजीच्या मळ्याजवळ येऊन पोचली. मंडळी मोठमोठ्याने सदूला व दाम-जीला हाका देत होती. मळ्यातील वडाच्या झाडाजवळ ती येऊन पोचली व त्यांनी एक मोठ्याने हाक दिली. त्याबरोबर झाडावरून "आम्ही इथं आहो हो ऽऽ" असा सदूने प्रतिसाद दिला. व तो हळूहळू खाली उतरू लागला. त्याच्या खांद्यावर घेलाशेटचा दामजी होता. सदू खाली उतरल्याबरोबर सदूच्या खांद्यावरील दामजी सर्वांच्या दृष्टीला पडला, सावकारणीने धावत जाऊन "माझा बच्चा" म्हणत पोराला पोटाशी धरले व सदूचे पाय धरले व घेलाशेट तर सर्व

काही विसरून म्हणाले,

"सदू, तू देवासारखा माझ्या मुलाच्या रक्षणाला पुढं झालास. तुमच्याविरुद्ध मी जे काय केले होते, त्या पापाची मला क्षमा कर."



"हे काय शेटजी, मी किती लहान आणि आपण माझे पाय धरता? मी जास्त काहीच केले नाही. कर्तव्य बजावले. आपला दामजी म्हणजे माझा भाऊच असे मी समजतो."

तेथे जमलेल्या सर्वांना लहान वयातही सदूच्या अंगी असलेल्या शहाणपणाचे, धिटाईचे व कर्तव्याच्या जाणीवेचे कौतुक

वाटले. विष्णू मास्तर पुढे येऊन सदूला पोटाशी धरीत म्हणाले,

"शाब्बास सदू, आतापर्यंत तुला मी जे शिक्षण दिले त्याचे खरे चीज केलेस. माझा शिष्य शोभतोस."

सावकारणीला पार्वती म्हणाली,

"बाई, दामजी वाचला याला कारन माजा सदू नायं. तर हा वडदेव हाय. शेटजी आमच्या धन्यास्नी या वडदेवाला काडून टाकायला सांगीत व्हते. त्या वडदेवाला नमस्कार करा–"

सावकारणीने वडापुढे साष्टांग नमस्कार घातला व ती नवऱ्याला म्हणाली,

"आता तरी शहाणपणा शिका अन् मेली ती गरीबांना नाडण्याची सावकारी बंद करा."

घेलाशेट हात जोडून पार्वतीला म्हणाले,

"पार्वतीबाय यापुढं तुमचीच झाडं नव्हे तर गावातल्या कुणाचीच झाडं मी सापळेला तोडू देणार नाही."

"अहो शेटजी, वनाचें संरक्षण करा." असे आपल्या सरकारचे सांगणे आहे. मास्तरांनी आम्हाला शिकविले आहे की, "वृक्षवल्ली आम्हा, सोयरी वनचरे" या अभंगातील अर्थ सर्वांनी ध्यानात ठेवला पाहिजे." सदू म्हणाला.

बनगावातील शेतकऱ्यांच्या झोपड्यांचे सायली नदीच्या पुराने केलेल्या नुकसानाची बातमी सर्वत्र पसरली. डॉ. राजेशने खटपट करून पुरामुळे नुकसान झालेल्या लोकांसाठी सरकारकडून मदत मिळवून दिली. तसेच तालुक्याच्या गावातील लोकांनीही स्वयंस्फूर्तीने पैसे, धान्य, कपडे इत्यादींची मदत बनगावातल्या लोकांना दिली. या कामासाठी सदू व रघू हे मुद्दाम तालुक्याच्या गावी जाऊन आले.

लवकरच जोरदार पाऊस, वादळ व पूर यामुळे उध्वस्त झालेले बनगावचे जीवन सुरळीतपणे चालू लागले. सदूनें सुरू केलेल्या मुलांच्या सेवापथकाला याबाबतीत लोकांनी धन्यवाद दिले.

* *

## ६. सदूची करामत

बनगावातील बहुसंख्य माणसे निरक्षर असल्यामुळे त्यांच्यामध्ये भोळ्या समजुती अतिशय होत्या. नदीकिनाऱ्यावर जो नागमोडी रस्ता जात होता, त्या मार्गात अनेक मोठमोठे धोंडे पडलेले होते. त्यांना शेंदूर लावून वेगवेगळ्या देवांचे रूप गावकऱ्यांनी दिले होते. तथापि गावकऱ्यांचे रक्षण करण्याऐवजी रात्रीच्या वेळी येणाऱ्या जाणाऱ्या बैलगाड्या व वाटसरू यांना अपघात करण्याचे कामच हे देव जास्त करीत असत.

सदूच्या सेवादलानें हें दगड उचलून नदीच्या काठी ओळीने मांडण्याचे काम करावयास सुरुवात केली. काही गावकऱ्यांना ते आवडले नाही. परंतु "देव नदीच्या जवळ बसविले तर त्यांना ते अधिक आवडेल." असे सांगून पोरांनी त्यांची समजूत काढली. याखेरीज अभयगडाच्या आसपास खूप लहानमोठे गोटे पसरले होते, ते गोटेही त्या मोठ्या दगडाच्या खालच्या अंगाला भरीला टाकून नदीच्या पात्राला बंधारा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नंतर

नदीच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्यावरील खाचखळगे भरून काढले. अशा रीतीने बनगावच्या आजुबाजूच्या गावांना जाण्यासाठी मुलांनी एक चांगला मार्ग तयार केला. तेव्हापासून पुष्कळसे अपघात होण्याचे बंद झाले.

सायली नदीला पूर आला. त्यामुळे नुकसान पुष्कळ झाले. पण त्याबरोबरच एक दोन चांगल्या गोष्टीही झाल्या. काही लोकांच्या जुनाट आणि घाणेरड्या झालेल्या झोपड्या नव्याने बांधल्या गेल्या. गावकऱ्यांनी एकत्रित होऊन गाव सुधारण्यासाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना सर्वांच्या मनात रुजू लागली व पुराच्या पाण्याने येताना पुष्कळसा गाळ काठावर आणून टाकला. हा गाळ काळ्याशार मातीचा होता. एके दिवशी विष्णू मास्तर मुलांबरोबर नदीकाठी गेले असता त्यांना सदू म्हणाला,

“मास्तर, या गाळाचा आपण उपयोग करून घेऊ.”

“तो कसा?” मास्तरांनी विचारले.

“आम्ही सर्व मुले या गाळात भाजीपाला लावतो व तो पुढे तालुक्याच्या गावी विकायला पाठवू. प्रत्येकाला परिश्रमाचे पैसे देऊन उरलेले पैसे शाळेची इमारत बांधण्याच्या फंडात टाकायचे.”

“वा! सदू, कल्पना मोठी नामी काढलीस!” मास्तर उद्गारले.

मुले उत्साहाने कामाला लागली. त्यांनी गाळाचे वाफे तयार केले. त्यात पावसाळ्यात होणाऱ्या वेलभाज्या व इतर भाज्यांची बियाणे पेरली. लौकरच पावसाला सुरुवात झाली व सेवादलाचा मळा फोफावू लागला. लाल भोपळे, दुधी भोपळे, काकड्या, तोंडली, गोवारी, भेंडी, अळू इत्यादी नाना प्रकारच्या भाज्यांची रोपे टवटवीत दिसू लागली. मुलांच्या आनंदाला पारा-

वार राहिला नाही.

दरडीजवळची हातभट्टी पकडली गेल्यापासून बनगावातील दारू पिणारांना धास्ती बसली होती. जानोजीने तर दारू न पिण्याची शपथच घेतली होती. तरीसुद्धा चोरून मारून एखाद दुसरा गावकरी दारू पीत असे. एके दिवशी सदूला एक विलक्षण शोध लागला. बनगावातील एक गावगुंड काही लोकांना गांजा पुरवितो व त्यांना गांजा पिण्याचे व्यसन लावीत आहे. सदू व त्याचे मित्र यांनी गुपचूप या गोष्टीचा माग घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तो माणूस त्याच्या परसात गांजाची लागवड करून मग त्याची विक्री करतो असे त्यांना आढळून आले. 'दुर्गुणाचे जिथल्या तिथेच निर्मूलन केले पाहिजे" असे गुरुजींनी मुलांना शिकविले त्यामुळे त्यांनी ती खबर पोलीसपाटलाला दिली. तो गृहस्थ मुद्देमालासह पकडला गेला.

त्याच सुमारास सरकारच्या दारुबंदी विभागातर्फे बनगावात एक शिबिर घेण्याचे ठरले व तसे बनगावच्या पाटलाला कळविण्यात आले. पावसाचा जोर कमी झाला होता. गौरी गणपतीचा सण जवळ आला होता. तेव्हा यंदा बनगावात सार्वजनिक गणेशोत्सव करून त्यातच शिबिर आयोजित करावे अशी सर्व मुलांनी जाऊन सरपंचांना विनंती केली. त्यांनाही ती फार आवडली.

मुलांनी तयार केलेल्या मळ्यातून भराभर भाजी निघाली व ती तालुक्याच्या बाजारात विकून त्यांनी शाळेसाठी पाचशे रुपये मागे टाकले. आपली मुले इतकी हुशार आहेत हे पाहून साऱ्या पालकांना आनंद वाटला.

पावसाचा जोर अगदीच कमी झाला होता. मुलांनी पुन्हा आंबराईमध्ये मंडप बांधून गणेशोत्सवाची तयारी चालविली.

अः यगडातील दालने स्वच्छ करून तेथे दारुबंदी विभागाचे शिबिर घ्यायचे व तेथेच आलेल्या पाहुण्यांची राहण्याची सोय करण्याचे ठरविले. शिबिराची सभा आंबराईच्या एका बाजूला घेतली होती त्यावेळी गावातील सर्व लहानथोर मंडळी हजर राहिली. संघटकांनी प्रभावी शब्दात दारू, गांजा, अफू इत्यादी मादक पदार्थांच्या सेवनाने शरिराची कशी हानी होते व नंतर कुटुंबाची कशी धूळधाण होते हे लोकांना समजावून सांगितले. यावेळी सदूनेही छोटेसे पण सुंदर भाषण केले. तो म्हणाला,

"गावकऱ्यांनो, मी लहान तोंडी मोठा घास घेतोय असे वाटेल पण संघटकांनी सांगितलेल्या गोष्टींचे आपण पालन केले पाहिजे म्हणजे बनगाव हा एक आदर्श गाव गणला जाईल. तरी श्री. विघ्नहर्त्या गणेशाची शपथ घेऊन "मी यापुढं मादक पदार्थांचे सेवन करणार नाही." असे सर्वांनी इथं कबूल करावे. हा आम्हा मुलांचा हट्ट मोठी माणसं पुरवतील, अशी मी आशा करतो."

सदूचे भापण ऐकल्याबरोबर टाळ्यांचा एकच कडकडाट झाला व सर्वांनी गणपतीबाप्पाची शपथ घेऊन मादक पदार्थांचा उपयोग आम्ही कधी करणार नाही असे एकसूरात सांगितले. त्यानंतर दोन दिवस दारूचे दुष्परिणाम दाखविणारे दोन चित्रपटही तेथे दाखविण्यात आले. गावातील अनेक वृद्ध माणसांनी सिनेमा प्रथमच पाहिला. सिनेमातील दृश्ये पाहून लोकांच्या मनात दारू-विषयी अधिकच तिरस्कार निर्माण झाला.

गावातला पहिलाच गणेशोत्सव फारच गाजला. गावातल्या मुलांनी याप्रसंगी लोकनाट्ये, पोवाडे, नकला इत्यादी कार्यक्रम आयोजित केले. एक दिवस खास स्त्रियांसाठी ठेवला होता. हळदी-कुंकवाचा समारंभ होता व त्याप्रसंगी फेर धरून स्त्रियांनी गाणी

म्हटली. मुलींनी झिम्मा, फुगड्या, कोंबडा इत्यादी अनेक खेळ खेळून दाखविले. म्हाताऱ्या बायकांनीही जुनी गाणी म्हटली.

शेवटच्या दिवशी वाजत गाजत गणेशाची मिरवणूक काढून नदीमध्ये त्याचे विसर्जन केले.

गणेशोत्सवाच्या प्रसंगी एक अप्रिय गोष्ट घडली. बनगावाच्या हरिजनांची वस्ती गावाबाहेर होती. त्यात महार, चांभार इत्यादी लोकांची सेवा करून पोट भरणारे लोक राहत असत. गावातल्या शेतकऱ्यांमध्ये जातिभेद फार प्रखर होता. ते या लोकांकडून वहाणा शिवून घेण्याची वगैरे कामे करून घेत असत. पण त्यांना अस्पृश्य म्हणून वाळीत टाकल्यासारखे वागवीत.

धुणी धुण्यासाठीसुद्धा त्यांना नदीच्या एका लांबच्या टोकाला जावे लागे. सदूला व त्याच्या मित्रांना अस्पृश्यतेचा कलंक गावाला लागू नये असे वाटत होते. गणेशोत्सवामध्ये अशी एक गोष्ट घडली की त्यामुळे या गोष्टीला आपोआपच चालना मिळाली.

गणेशोत्सवामधील पोवाड्याचा वगैरे कार्यक्रम पहाण्यासाठी साहजिकपणेच कुतूहलाने हरिजनांची मुलेही मंडपाबाहेर जमा झाली. एक लहान मुलगी हळूच मंडपात शिरून मौज पाहू लागली. तिला काही लोकांनी पाहिले आणि हरिजन पोरीने आत येऊन भ्रष्टाचार केला हे पाहून त्यांना फार राग आला व त्या भरात त्यांनी त्या छोट्या पोरीला मंडपात ढकलून तिच्या मुस्काटात मारायला सुरवात केली. तेवढ्यात आणखी काही माथेफिरू तर त्या एवढ्याशा जीवाला लाथाबुक्यांनी मारू लागले. तो गलबला ऐकून सदू धावत तेथे गेला व एकदम मारणारांना मागे ओढीत म्हणाला,

"हे काय, त्या गरीब पोरीचा जीव घ्यायचा विचार आहे

की काय तुमचा? "

त्याच्या अंगावर ओरडून तो माणूस म्हणाला,

"या म्हारड्यांना असेच मारले पाहिजे. आमच्यात घुसून भ्रष्टाचार करतात. तू मोठा शानपना आमाला नको शिकवू."

इतक्यात घेलाशेट, विष्णूमास्तर वगैरे मंडळी मध्य पडली. व त्यांनी त्या पोरीला त्या माथेफिरू लोकांच्या हातून सोडविली. व तिला कपभर चहा आणि पेढा दिला. थोड्या वेळाने त्या मुलीचे आईबाप तेथे आले व तिला घेऊन गेले.

हा सर्व प्रकार पाहून सदूचे मन उद्विग्न झाले. "आमच्या लोकांच्या मनातील ह्या जातिभेदाच्या भावना कधी निघून जाणार आहेत कोण जाणे." असे मनात म्हणत तो नदीकाठी एका दगडावर जाऊन बसला. त्याला शोधीत रघू व मास्तर थोड्या वेळाने तेथे आले. मास्तरांना पाहून सदूला रडू कोसळले. तो स्फुंदत म्हणाला,

"गुरुजी, त्या बिचाऱ्या लहान मुलीला मारण्याची काही सीमा असावी—"

"अरे बाबा, हजारो वर्षे या अशिक्षित लोकांच्या मनात मुरलेल्या कल्पना एकदम दूर होणार नाहीत. आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या पूज्य गांधीजींनी अस्पृश्यता निवारण्यासाठी किती कष्ट केले. त्याचा अगदीच काही उपयोग झाला नाही असे नाही. आपले बनगाव अगदीच एकीकडे पडले आहे. आता तुमच्या सारखी थोडं—बहुत शिकलेली तरुण मुलं पुढाकार घेऊ लागली आहेत. ही या गावाला पुढे येणाऱ्या सुस्थितीची पदचिन्हे आहेत."

"गुरुजी, माझ्यामनात एक चांगला विचार आला आहे. आपण

या सर्व हरिजनांना एकत्र बोलावू व दुसऱ्या बाजूला आपल्या गावकऱ्यांना बोलावून एक सत्यनारायणाची महापूजा करू. त्यावेळी तुम्ही व आम्हीसुद्धा हरिजनांच्या बाबतीत लोकमत बदलण्याचा प्रयत्न करू या" सदूच्या मनात एक अभिनव कल्पना येऊन तो म्हणाला.

"आणि गुरुजी, त्यावेळी आपण जिल्हाधिकाऱ्यांना मुख्य पाहुणे म्हणून आमंत्रण देऊ या. म्हणजे अस्पृश्यांच्या बाबतीत सरकारी धोरण काय आहे ते पण लोकांना समजेल. म्हणजेही त्यांच्या मनावर थोडे दडपण पडेल. राजेशभाऊ त्यांना आणण्यासाठी आपल्याला मदत करतील."

मास्तरांना ही कल्पना फारच आवडली. दुसरे दिवशी ते तालुक्याच्या गावी निघून गेले व सदू आणि रघू आणि त्याचे सेवादल सत्यनारायणाच्या सार्वजनिक पूजेसाठी गावकऱ्यांकडून पैसे वगैरे जमवू लागले. गणेशोत्सवाच्या परिसमाप्तीचा एकभाग म्हणून ही पूजा ठरविण्यात आली. त्याच्या मागील उद्देश मात्र मुलांनी उघड केला नाही. नाहीतर बुरसटलेल्या मनाच्या गावकऱ्यांनी त्यांना विरोध केला असता. सार्वजनिक गणेशोत्सवामागे तयार केलेला मंडप अद्यापी होताच. त्यातच सर्व करण्यात आले.

सुदैवाने डॉ. राजेशच्या मध्यस्थीने जिल्हाधिकाऱ्यांनी या वेळी येण्याचे आमंत्रण स्वीकारले. हे अधिकारी अत्यंत सुस्वभावी असून त्यांना लोककल्याणाची तळमळ होती. राजेशकडून सदूबद्दल व त्याच्या सेवादलाविषयी माहिती ऐकून ते म्हणाले,

"वा! शेतकऱ्यांची अशिक्षित मुलेसुद्धा आता जागृत होऊ लागली आहेत. अशा मुलांना अवश्य उत्तेजन दिले पाहिजे. मी शिक्षण खात्याच्या प्रमुखांना सांगून त्याच्या इंग्रजी शाळेतील शिक्ष-

णाची व्यवस्था करीन."

"आपली त्या गरीब पण हुशार मुलावर मेहरबानी होईल सर! मी त्याला या वर्षी स्कूल फायनलला बसविणार आहे. गावात शाळा नसल्यामुळे आपण त्याला खासगी रीतीने अभ्यास करून परिक्षेला बसण्याबद्दल परवानगी मिळवून देण्याची कृपा करून आम्हाला मदत करावी अशी विनंती आहे."

"मास्तर, अहो विनंती हा शब्द कशाला? तशा प्रकारची खटपट मी जरूर करीन. नाहीतर एक वर्ष त्याची परीक्षा घेऊन त्याला शाळेत दाखल करू."

मास्तर बनगावला जिल्हाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून येणार अशी चांगली बातमी घेऊन परत आले. लोकांना खूपच आनंद झाला. कारण त्यांना आपली अनेक गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घालायची होती.

सकाळी भटजींना बोलावून विधीपूर्वक सत्यनारायणाची पूजा केली. पूजेला मास्तर व मास्तरीणबाईंचे जोडपे बसले होतें. सत्यनारायणाची आरास छान सजविली होती. मुलांनी प्रत्येकाच्या मळ्यातली फुले आणून मंडप सुशोभित केला होता. प्रसादाची तीन–चार मोठमोठी पातेली तयार झाली होती.

सायंकाळी चाराच्या सुमारास मुख्य पाहुणे व डॉ. राजेश मोटारीने बनगावला आले. त्यांचे गावातील प्रमुख मंडळींनी स्वागत केले. त्यांची उतरण्याची सोय अभयगडाच्या हॉलमध्येच केली होती. त्यासाठी तालुक्याच्या गावातून दहा गॅसच्या बत्त्या आणल्या होत्या.

अभयगड व त्याच्या आजुबाजूचा देखावा पाहून साहेब फारच खूष झाले. तें डॉ. राजेशना म्हणाले,

"या ऐतिहासिक गडाची डागडुजी करून प्रवाशांना तो पहाण्याला येण्यासाठी प्रेक्षणीय स्थळ म्हणून सरकारच्या प्रवासी संचलनालयाने व्यवस्था करावयास हवी. ही नदी इतकी सुंदर आहे. या नदीकाठी एखादे आरामगृह किंवा प्रवासीगृह बांधावे इतकी ही जागा छान आहे."

"सर, आपण अगदी माझ्या मनातले बोललात. माझ्या मनातसुद्धा हा विषय घोळत होता. त्यामुळे या गावातील लोकांचे मतपरिवर्तन व सुधारणा व्हायला मदत होईल." डॉ. राजेशने उत्तर दिलें.

"आपण करू या काहीतरी!" एवढेच साहेब उद्गारले.

सायंकाळी सभेला जाण्यापूर्वी मुलांनी केलेला नदीकाठचा मळा साहेबांनी पाहिला व त्याबद्दल मुलांचे कौतुक केले. तसेच अभयगडाच्या अलीकडे माळरानावर शाळागृह बांधण्याची कल्पनाही त्यांना पसंत पडली.

हळुहळू मंडपामध्ये गॅसच्या बत्त्यांचा झगमगाट झाला. गावकरी स्त्रीपुरुष अंथरलेल्या पोत्यांच्या जाजमावर येऊन बसू लागले. मंडपाची एक बाजू दोऱ्या बांधून राखीव म्हणून ठेवली होती. तेथे कोण बसणार आहे याबद्दल गावकरी आपापसात चर्चा करू लागले. पूजेच्या एका बाजूला एक छोटेसें, फळया बांधून तयार केलेले उच्चासन असून त्यावर सरपंचांच्या वरून आणलेल्या चार खुर्च्या व टेबल मांडले होते.

हळुहळू सेवादलाच्या सैनिकांनी हरिजन वाड्यातील लोकांना मंडपात राखीव जागी आणून बसवावयास सुरुवात केली. ते पाहून गावकरी चकित झाले. काही लोकांचा तर जळफळाट झाला. पण साहेबांपुढे त्यांना काहीच बोलता येईना.

समारंभाला सुरुवात झाली. प्रथम मुलांनी स्वागत गीत म्हणून मुख्य पाहुणे, डॉ. राजेश व गुरुजी यांना स्वतः बनविलेले हारतुरे देऊन त्यांचा सत्कार केला.

मग कथाकथनाचा छोटासा कार्यक्रम झाला. एका छोट्या मुलाने संत एकनाथाच्या भूतदयेबद्दलची गोष्ट चुणचुणीतपणे सांगितली. तो शेवटी म्हणाला,

"एकनाथमहाराजांनी वाळवंटात तळमळत पडलेल्या एका हरिजनाच्या मुलाला उचलून घेतले आणि आपण भजनामध्ये नुसतें त्यांचे अभंग म्हणतो, पण त्यांच्याप्रमाणे वागत नाही. आमच्या गणेशोत्सवातील मौज पहायला आलेल्या एका छोट्या हरिजन मुलीला आम्ही बेदम मारतो हे किती बरं वाईट?"

त्या मुलाने सांगितलेली गोष्ट गावकऱ्यांना फार आवडली. एक म्हातारा गावकरी तर स्वयंस्फूर्तीने उठून स्टेजवर गेला व म्हणाला,

"गावकऱ्यांनो, या ल्हान पोरापासून आपुन लई शिकलं पायजे. अवो परतक्ष पांडुरंगानं–इट्टलानं दामाजीसाठी इठू म्हाराचं रूप घेतलं नव्हं का?"

मग सगळे गावकरी ओरडले, "होय होय. आपण आपल्या हरिजन बंधुभगिनींना प्रेमानं वागविलं पाहिजे."

सदू आपल्या भाषणात म्हणाला,

"नुसतं प्रेमानं वागविलं पाहिजे; एवढंच नव्हे तर त्यांना जवळही केलं पाहिजे. त्यांना आपल्या विहिरीवर व नदीच्या भागात पाणी भरण्याची मोकळीक दिली पाहिजे. आपण सर्व एकाच देवाची लेकरं आहोत तेव्हा हा मतभेद सोडला पाहिजे. चांभार भाऊने शिवलेली वहाण वापरताना आपल्याला विटाळ

होत नाही. मग शिवा चांभाराचा स्पर्श झाला तर भ्रष्टाचार कसा काय होतो ?"

पाहुणे बोलताना म्हणाले,

"गावकऱ्यांनो, तुमची मुलं फार शहाणी व समजुतदार झाली आहेत; याचे श्रेय मी गुरुजींना देतो. आताच छोट्या दामूने व सदूने सांगितलेल्या गोष्टी लक्षात घ्या. आपापसात फूट पाडणाऱ्या, कोणत्याही विचारांना थारा देऊ नका. सूर्यनारायण तुम्हाला प्रकाश देतो व हरिजनांना देत नाही का ? पाऊस तुमच्या



शेतात पडतो व हरिजनांनी लावलेल्या मळ्यात पडत नाही का ? वारा सर्वांसाठी वाहतो ना ? जर देव भेदभाव करीत नाही तर आपण का करावा ? हरिजन व आपण एकाच देवाची लेकरं आहात. तेव्हा यापुढे तुमच्या बनगावाने इतर खेड्यांना आदर्श

घालून दिला पाहिजे. आता माझ्या हजेरीत या हरिजन मंडळींना काही गावकऱ्यांनी स्वतःच्या हातांनी प्रसाद वाटावा. अशी मी त्यांना विनंती करतो."

थोर पाहुण्यांच्या सांगण्याबाहेर जाण्याचे धैर्य गावकऱ्यांना झाले नाही. त्यांच्यापैकी दहाबारा जण प्रसादाचे द्रोण हरिजनांच्या हाती देऊन त्यांना जवळ घेऊन 'राम राम' करू लागले. आपल्या-सारख्या उपेक्षितांच्या बाबतीत हा बदल घडवून आणणाऱ्या पाहुण्यांना व सदूला दुवा देत हरिजन आपापल्या घरी परतू लागले.

अशा रीतीने बनगावातील अस्पृश्यतेचा प्रश्न बऱ्याच अंशी सोडविण्यात मास्तर व सदू यांना बरेचसे यश आले. पुढील काही महिने त्यांच्या वसाहतीमध्ये जाऊन मुलांनी त्यांच्यासाठी साक्षरतेचा वर्ग चालविण्यास व त्यांना स्वच्छता व आरोग्य याचे धडे देण्यास सुरुवात केली.

मुलांकडे पाहून गावातील काही प्रौढ लोकांनाही आपण शिकावे असे वाटू लागले. तेव्हा सदूने प्रौढांसाठी एक वर्ग सुरू केला. वयस्कर मंडळी चावडीमध्ये बोर्डावर लिहिलेली अक्षरे त्याशेजारी लावलेल्या चित्रांच्या नकाशाकडे बघून गिरवताना पाहून गुरुजींना धन्यता वाटू लागली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने आठवड्यातून एक सेविका बनगावी येऊ लागली व मुलांचे संगोपन कसे करावे, त्यांना निरोगी राखण्याचा कशा रीतीने प्रयत्न करावा तसेंच स्वच्छतेचे काय महत्त्व आहे यासंबंधी शिक्षण देऊ लागली. अशा प्रकाराने बनगाव हळुहळू सुधारणेकडे वाटचाल करू लागले.

* *

# ७. बनगावातील समाजकल्याण कार्य

दिनूच्या वडील वहिणीचें नाव सुमन होते. तिचे लग्न मुंबई-तील परांजपे यांच्या मुलाबरोबर झालें होतें. तिचे पती इंजिनिअर झालेले होते. ते ज्या कंपनीत नोकरी करीत होते तिने त्यांना काही विशेष अनुभव घेण्यासाठीं इंग्लंडला पाठविले. तिथे ते दोन वर्षे राहणार होते. सुमन काही दिवस सासरी राहून बनगावला माहेरीं आली होती. तिचा विचार तेथें वर्षभर राह्यचा होता. ती एस्. एस्. सी. झाली असून तिने टाटाच्या समाजकल्याणाचा कोर्सही पुरा केला होता.

सदू वगैरे मुलांनी बनगावामध्ये चालविलेले सुधारणा कार्य पाहून सुमनला खूप आनंद झाला. एके दिवशी तिने त्यांच्या बाल-सेवादलाची एक सभा घेऊन त्यांचे खूप कौतुक केले. सुमनला सदू म्हणाला,

"सुमाताई, तुम्ही म्हणे स्त्रिया व बालकल्याणाची एक परीक्षा पास झाला आहात. मग इथं काहीतरी कार्य सुरू करा."

"सुमाताई, तुम्ही जर काही असं कार्य सुरू केलंत तर आम्ही तुम्हाला मदत करू." रघूने म्हटले, मुलांचा तो उत्साह पाहून सुमनला खूप आनंद झाला. "नाहीतरी वर्षभर आपण इथं राह-णारच आहोत. तेव्हा आपल्या गावाला आपला काहीतरी उपयोग

व्हावा." असा विचार तिच्या मनात वारंवार येतच होता. त्यातून आता सदू रघूने तिच्या मनातील विचाराला जोराची चालना दिली. ती त्यांना म्हणाली,

"वा! मी अवश्य समाजकल्याणाचे काहीतरी काम करीन. गावातल्या स्त्रिया जर पुढं आल्या तर मी प्रथम एक महिलामंडळ स्थापून कामाला सुरुवात करते. तुम्ही तुमच्या सभासदांना घरोघर जाऊन आमंत्रण द्यायला सांगा. आपण येत्या गुरुवारी स्त्रियांची एक सभा घेऊ."

"वा—छानच ताई! आम्ही आतापासूनच कामाला लागतो."

सदू व त्याच्या सेवादलातील मुलांनी घरोघर हिंडून गावकरी स्त्रियांना गुरुवारच्या सभेची निमंत्रणे दिली. वृद्ध स्त्रिया सभेला यायला कबूल झाल्या.

शाळेच्या संकल्पित माळरानाच्या जागेवर ही सभा घेण्यात आली. सुमाने सर्व स्त्रियांचे आपुलकीने स्वागत केले. ती म्हणाली,

"तुम्ही इथं जात गोत विसरून एकत्रित जमला आहात. प्रत्येक गावात आता ग्रामपंचायत सुरू झाली आहे लवकरच समाजकल्याणाचे कार्य इथं सुरू होईल. पण याच्या आधीच आपणही ते सुरू केले तर छान होईल—"

"पण ताई बाय, ह्यो समाजकल्याण म्हंजे व्हो काय?" एका चुणचुणीत खेडूत स्त्रीने प्रश्न केला.

"समाजकल्याण म्हणजे आपली सुधारणा करायची. स्वच्छता कशी राखावी, रोग कसे नाहीसें करावे, मुलांना कसे वाढवावे, त्यांना शिक्षण देण्यासाठी आपणही कसे शिकावे—काही नवे कामधंदे करून त्यावर पैसे मिळवून संसाराला मदत कशी करावी अशी अनेक कामे करणे किंवा करायला शिकणे." सुमनने शक्य

तितक्या सोप्या शब्दात स्पष्टीकरण केले.

"वा– ताईबाय, मग कंदी सुरू करायचं?"

"आपण एक महिलामंडळ स्थापन करू. मंडळ म्हणजे सवडी-प्रमाणे आठवडयातला एक दिवस ठरवून एकत्र जमायचे. मी माझे एक शिवण्याचे मशिन आमच्या ओटीवर ठेवीन. ते चालवायला तुम्हाला शिकवीन. प्रथम चोळया, झबली, मुलांची गळोती कशी कापायची व शिवायची ते तुम्ही शिकले पाहिजे."

"आम्ही जरूर समदं करू."सर्व स्त्रियांनी सुमनला आश्वासन दिले.

महिलामंडळ प्रथम उत्साहानें सुरू झाले. पण शेतकरी स्त्रियांना शेतामळयाची खूप कामं करायची असतात. त्यामुळे मंडळात मुलीच जास्त येऊ लागल्या. लवकरच सुमनताईंच्या देखरेखीखाली मुलींचे एक पथक तयार झाले. या मुलींना अक्षरओळख झाली. छोटे कपडे शिवायला आणि थोडेसं भरतकाम भरायलाही त्या शिकल्या.

मधुन मधून प्रौढ भगिनी क्लासला येत. त्यांना सोप्या शब्दामध्ये सुमन बालसंगोपन, स्वच्छता इत्यादी गोष्टींसंबंधी समजावून सांगत असे. शिवाय जिल्हाधिकाऱ्यानी नेमलेली सेविका आठवडयातून एक दिवस घरोघर जाऊन खेडूत स्त्रियांना प्रत्यक्ष भेटून त्यांना अनेक उपयुक्त गोष्टींचे ज्ञान करून देतच होती. हळुहळू गावातील स्त्रियांमध्ये जागृती होऊ लागली. त्या आपली दैनंदिन कामे सांभाळून सुमनताईंच्या मंडळात चाललेल्या कार्याचा लाभ घेऊ लागल्या.

एके दिवशी सदू सुमनताईंना म्हणाला,

"ताई, आपल्या या भगिनींना आपण उपयुक्त मार्गदर्शन

करीत आहोतच. पण आजच मी गुरुजींजवळ थोडी चर्चा केली. ठरविले की मधुन मधून यांच्यासाठी कथा सांगणे, गाणी म्हणणे असे कार्यक्रमही सुरू करावे म्हणजे त्यांना मंडळाबद्दल अधिक आस्था वाटू लागेल."

"हो रे हो सदू, तुझी कल्पना छानच आहे. आपण त्यांना रामायण, महाभारत यातील कथा सांगूच. पण त्यांनाही कथा सांगायला, गाणी म्हणायला सांगू म्हणजे त्यांना जास्त आपुलकी वाटू लागेल."

"नुसती आपुलकी नव्हे सुमाताई, आम्हा खेडवळ लोकांच्या लोककथांपासून कितीतरी शिकण्याजोगं असतं, असं गुरुजी आम्हाला सांगत असतात. पवारांची आजी आहे ना ती छान कथा सांगते." सदूने माहिती पुरवली.

"आणि खंडू मोऱ्याची आई छान ओव्या अन् गाणी म्हणते." "ठीक आहे!" सुमन म्हणाली, "तुम्ही सांगता त्याप्रमाणे आपण करू. नाहीतरी आपल्या सरकारने लोकसाहित्य समिती स्थापन करून या साहित्याचे महत्त्व सुशिक्षित लोकांच्या ध्यानात आणून दिलेच आहे. शिवाय लोकगीते, लावण्या, पोवाडे यांचे कार्यक्रमही सरकार-तर्फे आयोजित होतातच. आपण आपल्या या छोटया गावातर्फे सरकारच्या कार्याला हातभार लावला तर छानच."

"हो तर काय ताई! लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाने लोकहिताच्या कामाला हातभार लावावा असे आम्ही गुरुजींकडून शिकलो आहोत." सदूने उत्तर दिले.

थोड्याच दिवसात महिन्यातून एक दिवस गावातील स्त्रियां-साठी करमणूकीचा कार्यक्रम सुरू झाला. प्रथम काही दिवस विष्णू-मास्तर, सदू आणि सुमन हे तिघे साधुसंतांच्या आणि रामायण, महा-

भारत यातील कथा निवेदन करीत असत. त्या कथा जमलेल्या सर्व बायांना आवडत असत. एके दिवशी अशाच एका कार्यक्रम प्रसंगी सुमन जमलेल्या स्त्रियांना म्हणाली,

"हे पहा, मला माहीत आहे की तुमच्यापैकी अनेकींना कितीतरी चांगल्या गोष्टी सांगता येतात. मग आम्हाला पण ऐकू द्या ना त्या !"

"होय हो ताई, या पवारांच्या आजींना तर कितीतरी गोष्टी येतात." सदू उद्‌गारला.

"माज्या कसल्या रं बाबा गोष्टी !" आपलं प्वारासोरांना वळाण लावण्यासाठी काय बी तरी सांगायचं." पवारांची म्हातारी आई म्हणाली,

"वा! मग तर तशा गोष्टी आम्हाला ऐकल्याच पाहिजेत बरं का आजीबाई! एकदा का तुम्ही गोष्ट सांगायला सुरुवात केलीत की ताबडतोब आणखी दहाजणी सांगायला तयार होतील." सुमन म्हणाली.

तिचे ते शब्द ऐकून दोघी तिघी एकदम उद्‌गारल्या.

"व्हय, आजी लई ब्येस गोष्टी सांगत्यात. त्यांनी सांगितल्या-वर आमी पन सांगू."

आता पवारांच्या आजीबाईंना काहीच बोलता येईना. त्या स्वभावाने विनोदी असून त्यांच्या ठिकाणी कथाकथनाची कला स्वभावतःच होती. त्यांनी त्यांच्या शब्दात एक सुंदर व विनोदी कथा सांगितली. त्यानंतर तीच कथा शुद्ध पण सोप्या भाषेमध्ये सुमनने पुन्हा सांगितली.

"एका गावठ्या गावात एक शेतकरी राहत असे. त्याला दोन मुली आणि दोन मुलगे होते. त्यापैकी दोन मोठ्या मुलींची

लग्ने होऊन त्या सासरी गेल्या होत्या. एका मुलाचे लग्न नुकतेच झाले होते. धाकटा अद्यापि लहान होता. त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याचे नाव होतें बाबाजी. त्याची बायको मोठी संसारदक्ष बाई होती. पण ती आता हयात नव्हती. घराचा गाडा संभाळून ती नवऱ्याबरोबर शेतातही काम करायला जात असे.

मुलाचे लग्न होऊन सून घरी आली. म्हाताऱ्या बाबाजीने मोठ्या आवडीने तिचे नाव लक्ष्मी ठेवलें. दोन तीन वर्षानंतर तिला एक बाळ झालें. नातवाचें तोंड पाहून बाबाजीला खूप आनंद झाला. तो त्याला राम म्हणून हाक मारू लागला.

राम सात आठ महिन्याचा झाल्यावर लक्ष्मी स्वैंपाकपाणी करून शेतात काम करायला जाऊ लागली. जाताना ती रामूला पाळण्यात झोपवून धाकट्या दिराला– हरिला त्याच्याकडे लक्ष द्यायला सांगे.

लक्ष्मी एरव्ही मोठी चांगली मुलगी होती. पण तिच्या अंगात चोरटेपणाचा एक दुर्गुण होता. तो बाबाजीला किंवा तिच्या नवऱ्याला ठाऊक नव्हता. सकाळी नवरा अन् सासरा शेतावर गेलें की ती घरातले काम आटोपून नंतर शेतावर कामासाठी जाई– जाण्यापूर्वी ती शेरभर पिठात तेल, मिरचीची पूड, मीठ घालून त्याचा एक गोळा बनवून तो चुलीतल्या गरम राखेत खुपसून ठेवीत असे.

शेतावर आल्यानंतर लक्ष्मी तास अर्धा तास काम करी व सासऱ्याला म्हणे,

"कीर कोकिळा, दीर भुकेला
बाळ आरावला, लोळा करपला
मामंजी मी जाऊ का होऽऽघराला"

मग सासरा तिला म्हणे,

"ठीक आहे सूनबाई, कोकिळा ओरडतेय्, धाकटयाला भूक लागलीय्, लोळा करपतोय् अन् बाळ रडू लागलंय् तेंव्हा तू घरी जा."

मग ती घरी जाई आणि दुधाबरोबर राखेत भाजलेला तो लोळा (पिठाचा गोळा) दूध, गुळाबरोबर चोरून खाई व नंतर झोपत असे.

याप्रमाणे काही दिवस गेले. पहिल्या-पहिल्यानें लक्ष्मीच्या सासऱ्याला काही संशय आला नाही. पण रोज रोज ती जेंव्हा तीच तीच सबब सांगू लागली, तेंव्हा मात्र त्याच्या मनात शंका आली.

दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे लक्ष्मीं जेंव्हा शेतावरून घरी गेली, तेंव्हा तिचा सासराही थोडया वेळाने तिच्या मागोमाग घरी गेला आणि मागल्या दारच्या अंगणात लपून बसला. झोपडीला असलेल्या एका छोटया झरोक्यातून त्याला सून आतमध्ये काय करीत होती, ते दिसत होते.

लक्ष्मीने हात पाय धुऊन चुलीतला, खरपूस भाजलेला तो भला मोठा पिठाचा गोळा बाहेर काढला. मग दूध व गूळ घेऊन एका पितळीत तो कुसकरून ती खाऊ लागली. तेवढयात सासरा आत गेला व रागाने म्हणाला,

"काय ग चोरटे सूनबाई, आता तुझ्या रोज रोज घरी परत येण्यामागचा कावा मला समजला."

सासऱ्याला अचानक घरी आलेला पाहून लक्ष्मी चमकली. भीतीने तिच्या अंगावर काटा उभा राहिला. रडत रडत तिने सासऱ्याचे पाय धरले व म्हटले,

"मामंजी, माझ्यावर दया करा – पुन्हा मी असं करणार नाही."

तिला वर उठवीत तो दयाळू, वृद्ध शेतकरी म्हणाला,

"अग बये, तुला सासू नाही. तूच या घराची मालकीण आहेस. तुला इथं खायला कोण मना करणार होतं काय? पण ही चोरटेपणाची सवय लहानपणापासून तुला जडली असणार, तुझ्या आईवडिलांनी ती घालवली नाही. आता पुन्हा असं करू नको. नाहीतर हा छोटा राम थोडा मोठा झाला कीं तो पण तुझ्यासारखंच खोटं बोलू लागेल."

त्या दिवसापासून लक्ष्मीने शपथ घेऊन तिला लागलेली वाईट खोड टाकून दिली.

–कथा सांगून झाल्यावर सदू सर्व भगिनींना उद्देशून म्हणाला,

"किती छान गोष्ट आहे हीं! मुलांना वाईट सवयी लागू नयेत, यासाठीं मोठ्यांनी काळजी घ्यायला पाहिजे, असं ही कथा आपल्याला शिकविते."

"व्हय तर सदू दादा, आमची आय दळताना कित्तीं चांगल्या वव्या म्हनते आन् आमाला बी म्हनायला शिकवते." दहा वर्षांची मालुसऱ्यांची बगी म्हणाली,

"होय का? मग म्हणून दाखव बघू एक दोन ओव्या, बगूताई." सुमनने तिला सुचविले.

कपाळावरचे भुरभुरणारे केस सावरीत बगूताई, सुमन बसली होती, तिथे येऊन उभी राहिली व तिने गोड आवाजात एक ओवी म्हटली,

"सकाली उटवूनि द्येवाचं नांव घ्यावं,
आंदी द्येवाचं नांव घ्यावं ।

घेवाचं नाव घ्यावं, घेवांचं नांव घ्यावं,
मंग चितिल्या कामा जावं ।"



"कित्ती चांगली ओवी आहे! पाहिलंत भगिनींनो, आपण दळण दळताना लहानथोरांना कित्ती चांगला उपदेश करता, सकाळी उठल्याबरोबर आधी देवाचं नाव घ्यायला पाहिजे–"

"व्हय तर आंदी घेवाचं नाव घेऊन समद्यांनी ज्येच्या त्येच्या कामाला लागावं, असं म्हनतातच मुळी!" एक बाई उद्‌गारली.

"उठल्याबरोबर पुष्कळांच्या झोपड्यातून शिविगाळ ऐकू

येते. मोठी माणसं जे बोलतात तेच लहानगी पण शिकतात, म्हणूनच जुन्या माणसांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या गाण्यातून व ओव्यातून जीवन सुधारण्यासाठी काही उपदेशपर असे आपणास सापडते. आताच बघा ना माणसांनी खोटेपणा करू नये हे या आजीबाईंच्या कथेत किती सोप्या शब्दात दिसून आले!"

त्या दिवसापासून सुमनताईंनी गावातल्या वृद्ध स्त्रियांकडून ओव्या, गाणी, उखाणे व कथा जमविण्यास सुरुवात केली व त्याचे एखादे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा निश्चय केला.

कोकणातील बहुतेक खेडेगावाच्या आसपास कातकरी व ठाकर इत्यादी आदिवासी जमाती डोंगराच्या उतरणीवर असलेल्या टेकड्यांच्या उतारावर झोपड्या बांधून रहातात. या मागासलेल्या जमाती लाकूडफाट्यांचे भारे, करवंदे, जांभळे, रानभाज्या आणि ओढ्यात सापडणारी मासळी विकून आपली उपजीविका करीत असतात. उतरणीवर पिकवलेली नाचणी, वरी किंवा बाजारातून विकत आणलेल्या तांदळाच्या कण्या आणि रानातील कंदमुळे तसेच कासव, ससे यांचे मास हे त्यांचे खाद्य असते. पुरुष लंगोटी व कुडते घालतात आणि स्त्रिया गुढग्यापर्यंत लुगडे कसून नेसतात. व रंगीबेरंगी चोळ्या घालतात. या साऱ्या कातकरणींना आणि ठाकुरणींना गळ्यात रंगीबेरंगी मण्यांची पेंडी आणि डोकीत फुले माळण्याची खूप हौस असते. इतर खेडेगावाप्रमाणेच बन-गावच्या आजुबाजूला असणाऱ्या टेकड्यांच्या उतरणीवरही हे आदिवासी लोक रहात असत.

सुमनताई बनगावात राह्यला आल्यावर नवरात्राचे दिवस आले. गावातील ब्राह्मणवाडीत घरोघर नवरात्राची घटस्थापना होत असे. यावेळी सदू व त्याचे मित्र यांनी एक सार्वजनिक

नवरात्रोत्सव करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी गावातील सरपंचाची भेट घेतली, त्यानीहीं मुलांना उत्तेजन दिले. विष्णू मास्तर सदूला म्हणाले,

"हे पहा, अलीकडे मोठ्या गावातून नवरात्रामध्ये सरस्वतीचा उत्सव साजरा करतात. मी तशी एक मूर्ती तुम्हाला तालुक्याच्या गावातून विकत आणून देईन."

"अरे वा, मग तर किती चांगले होईल. कारण आम्ही सर्व खेडवळ मुले आता सरस्वतीची आराधना करतोय. तेव्हा तिची महापूजा करणे हेच चांगले."

मास्तर तालुक्याच्या गावी मूर्ती आणण्यासाठी गेले. तेवढ्यात मुलांनी मंडप वगैरे उभारला. त्याला कागदाच्या व झेंडूच्या माळा बांधून, मध्यभागी सरस्वतीची स्थापना करण्यासाठी सुंदर आसन तयार केले. आसनाच्या अवतीभोवतीची महिरपही छान केली होती. त्यासाठी त्यांना बाकेराव सुताराने स्वतः होऊन मदत केली होती. मास्तरांनी आणलेली सरस्वतीची मूर्ती शाडूच्या मातीची केलेली असून चांगली पाच फूट उंच होती. मूर्ती रंगदार असून तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता.

या उत्सवामध्ये मुलांप्रमाणे प्रौढ माणसेही हौसेने सामील झाली. या वेळी जातीपातींचा भेदाभेदही ती विसरली. गणेशोत्सवामुळे बनगावची माणसे अधिक जागृत झाली. त्यामुळे गावाच्या सुधारणेसाठी संघटना व्हावी हीं वृत्ती बळावली असल्याचे दिसले. त्याचे खरे श्रेय धडपड्यावृत्तीच्या सदूकडे होते.

या उत्सवात मुलांप्रमाणेच सुमनताईंच्या क्लासच्या मुलींनीही भाग घेतला होता. एक दिवस स्त्रियांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रम बालसेवादलाने आखला. तेव्हा गावातल्या सर्व स्त्रिया

व त्याप्रमाणेच अस्पृश्य स्त्रियाही मोठ्या संख्येने जमल्या होत्या. व त्या एकमेकींबरोबर मिळून मिसळून वागल्या. किंबहुना त्यांनी तसे वागावे या बाबतीत सदूने पुढाकार घेऊन प्रयत्न केले.

नवरात्रामध्ये आदिवासी स्त्रिया मडक्याचे तोंड पानानें बांधून दोन्ही बाजूला झाडाच्या सालीपासून बनविलेल्या दोऱ्या अडकवून एक मजेदार वाद्य तयार करतात. व घरोघर जाऊन ते वाद्य वाजवून त्यावर गाणी म्हणून पैसे गोळा करतात. गावातल्या या उत्सवामध्ये ह्या आपली वाद्ये घेऊन इकडे तिकडे हिंडू लागल्या.

"कारवावर पाय दिलान् कारवा तडाडला
कारवा तडाडिला, बुंधात मोडियला–"

हें त्यांचे गाणे सुमनला फार आवडले. बनगावातील इतर स्त्रियांप्रमाणेच या आदिवासींबद्दलही काहीतरी कार्य करण्याचा तिने निश्चय केला व सदूने त्याला पाठिंबा दिला. सरस्वतीचा उत्सव साऱ्या बनगावामध्ये फारच गाजला. बालसेवादल व सुमनताई यांच्याबद्दल गावकऱ्यांना विलक्षण आपुलकी वाटू लागली.

* *

## ८. केल्याने होत आहे रे

"आदिवासी जमातीसाठी आपण काहीतरी केले पाहिजे सुमाताई–" सदू एके दिवशी सुमनला म्हणाला.

"या एवढ्याशा गावठ्यात वाढलेल्या पोराला ही समाज-कार्याची तळमळ वाटू तरी कशी लागली." असे मनात म्हणत तिने त्याला उत्तर दिले.

"होय रे, माझी त्या लोकांच्या वसाहतीला भेट देण्याची फार इच्छा आहे. पण आई म्हणते की असं एकटं दुकटं तिथं जाणं योग्य नाही."

"हा आपला त्यांच्याबद्दल झालेला गैरसमज आहे ताई ! मी व रघू परवाच कातकरी वाडीवर जाऊन आलो. त्यांनी आम्हाला खूप प्रेमाने वागविले. तो एक ओठतुटका कातकरी गेंगाण्या आवाजत बोलतो व गावात लाकडाच्या व कारवींच्या मोळ्या विकायला येतो ना, तो तर मोठा उत्साही आहे त्याला आम्ही तुमच्याबद्दल सांगितलं आहे. तो म्हणाला,


"आमच्यासारख्या गरिबाची काळजी वाहणाऱ्या विष्णू-मास्तरांच्या ताई आम्हाला देवीसारख्या वाटतात !" सदूने माहिती पुरविली.

शेवटी एक दिवशी सुमन, सदू व रघू यांनी टेकडीच्या उतरणी-वर असलेल्या दोन चार कातकरीवाड्यांना भेट दिली. त्या लोकांची दैन्यावस्था व अज्ञान पाहून त्या तिघांना फारच वाईट वाटले. त्याबरोबरच त्यांचा मनमोकळेपणा आणि आतिथ्यशीलतेचा अनुभव घेऊन त्या तिघांना अगदी गहिवरून आले.

त्या दिवसापासून ती तिघे सेवादलाचे काही सभासद आणि सुमनच्या महिलामंडळातील काही मुली व स्त्रिया आजुबाजूच्या कातकरीवाड्यांना व ठाकूरवाड्यांना भेटी देऊ लागले. हळुहळू त्या लोकांच्या ठिकानीही स्वतःची उन्नती करून घेण्याची इच्छा उत्पन्न होऊ लागली.

विष्णूमास्तरांचेकडे काही आदीवासी मुले शिकायलाही येऊ लागली. त्यांना स्वच्छता, आरोग्य, नीटनेटकेपणा व शिक्षण याचे महत्त्व समजू लागले. "नव्या युगामध्ये आपल्या मुलांनी शिकले पाहिजे. त्याशिवाय आपण पुढे वाटचाल करू शकणार नाही." अशी जाणीव त्यांच्या आईबापांच्या ठिकाणी हळुहळू निर्माण करण्याचे काम सदू करीतच होता.

कातकरी स्त्रिया कच्ची व पिकलेली करवंदे, जांभळे, गावठी कैऱ्या या वस्तू गावात द्रोणातून विकायला आणीत असत. त्यांच्या-



कडे पाहून सदूच्या कल्पक डोक्यात एक कल्पना आली. एकदा का एखादा विचार मनात आला की ताबडतोब तो गुरुजींच्या कानावर घातल्यावाचून त्याला चैन पडत नसे. खेडवळ असूनही

सदूचा मेंदू अत्यंत चलाख होता. त्याच्या बुद्धीला नवनव्या कल्पना नेह्मी सुचत असत.

आदिवासींबद्दल सदूची कल्पना ऐकून मास्तरांनाही आनंद वाटला. ते म्हणाले,

"बाळ, तुझ्यासारखा मुलगा म्हणजे आमच्या बनगावची प्रतिष्ठा आहे असं मला वाटतं. सध्या आपल्या सरकारने लघु-उद्योगासाठी कर्ज देण्याची योजना पुढे आणली आहे. तिच्यामुळे गरीबगुरिबांचा फार फायदा होईल. 'गरिबी हटाव' हे आपल्या पंतप्रधानांचे–इंदिराजींचं तत्त्वज्ञान आहे व ते अशासारख्या योजनेने साकार होईल. या योजनेचा आपण फायदा करून घेऊ या–"

"पण गुरुजी लघुउद्योग कर्ज म्हणजे काय?" रघूनें प्रश्न केला.

हे कर्ज आतापर्यंत मोठमोठ्या उद्योगपतींना मिळायचे. गरीब लोकांना अशा कर्जासाठी सावकाराचे पाय धरायला लागायचे. आता राष्ट्रियीकरण केलेल्या पतपेढ्यातून पंचाहत्तर टक्के कर्ज मिळतें व एखादा हुशार गरीब इंजिनीयर वगैरे असेल तर त्याला शंभर टक्क्यापर्यंतही व्याज दिले जाते. आपल्या देशात मोठे उद्योगधंदे सुरू आहेतच. पण अशा लहानसहान धंद्याचे जाळे पसरले की, देशाचा आर्थिक दृष्ट्या विकास व्हायला खूप मदत होईल."

"गुरुजी, ही योजना फारच चांगली आहे. आपण त्याचा उपयोग करून घेऊ या." सदू म्हणाला.

"प्रथम आपण सुरुवात केली पाहिजे. जर समाधानकारक काम चाललं असलं तरच पुढं पाऊल टाकता येईल. तुझी कल्पना सांग पाहू."

"मी सांगते बाबा, सदूची कल्पना. त्याने मला त्याबद्दल आधीच सांगितले आहे. त्याचे म्हणणे असे आहे की करवंदे व कैऱ्या यांची मोठ्या प्रमाणावर लोणची तयार करायची–"

"सुमनताई म्हणतात की, शहरात जाम म्हणजे मुरांबा मिळतो. आपण करवंदे, जांभळे या फळांचा जाम बनविला तर–?" सदू म्हणाला.

"आपल्याकडे भात पिकते. पोह्यांचे पापडसुद्धा मोठ्या प्रमाणावर आपल्याला करता येतील." सुमनने सुचविले.

"मुलांनो तुमच्या कल्पना छान आहेत. त्यामुळे आदिवासी व गावातील गरीब शेतकरी स्त्रियांना काम मिळून त्यावर त्यांना पैसाही मिळेल. पण प्रथम आपल्याला मुंबई, पुण्यासारख्या शहरातील काही दुकानदारांशी संपर्क साधून त्यांची विक्रीसाठी मदत घ्यावी लागेल." विष्णूमास्तर म्हणाले.

"बाबा, ते काम मी करीन." सुमनने उत्साहाने उत्तर दिले.

सुमनला काही दिवसानंतर सासरी परत जावयाचे होते. त्यामुळे तिने सदूच्या सहाय्याने तात्काळ कामाला सुरवातच केली. प्रथम पापडापासून काम सुरू झाले. कारण करवंदे, कैऱ्या, जांभळे यांचा मोसम अद्यापि सुरू होण्यास अवधी होता.

गावातल्या म्हाताऱ्या बायासुद्धा पापडाचे काम हौसेने करू लागल्या. पोहे कांडण्यासाठी आदिवासी भगिनी येऊ लागल्या. गावामध्येच विक्रीला प्रारंभ झाला. विशेष म्हणजे या कामाला घेलाशेटच्या बायकोने त्यांच्या घराजवळ त्यांच्या मालकीची असलेली ऐसपैस खोली महिलामंडळाला दिली. ती जागा मिळवून घेण्यासाठी सदूने खूप खटपट केली. आता घेलाशेटची सदूवर फारच मर्जी होती. कारण त्याच्यामुळेच त्यांचा नवससायासाने

झालेल्या एकुलत्या एका मुलाचा जीव पुरामध्ये वाचला होता.

यथाकाल या लघुउद्योगात गावाबाहेर राहणाऱ्या बुरुडांच्या स्त्रियाही सामील झाल्या. बनगावातून तयार झालेली लोणची, पापड, मुरांबे इत्यादी माल प्रथम तालुक्याच्या गावात व नंतर पुणे, मुंबई सारख्या शहरात विक्रीला जाऊ लागला. धंद्याचा जम बसल्यावर डॉ राजेशच्या मदतीने विष्णूमास्तरांनी मंडळाला या कार्यासाठी कर्ज मिळवून दिले. आपली कल्पना खऱ्या अर्थाने पूर्ण झाल्याबद्दल सदूला मनस्वी आनंद झाला.

विष्णूमास्तरांनी अनेक प्रयत्न करून सदू व रघू यांना स्कूल फायनलच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळवली. काही दिवसानंतर परीक्षेचा निकाल लागून साऱ्या तालुक्यात सदू पहिला आला. रघूलाही चांगले गुण मिळाले. सदूला सरकारी शिष्यवृत्ती मिळाली व तो तालुक्याच्या शाळेत जाऊ लागला. तेथेही त्याने आपल्या बुद्धीची चमक दाखवून सर्व शिक्षकांची मने जिंकली. शाळेतील निरनिराळ्या कार्यक्रमाचे नेतृत्व करून तो विद्यार्थ्यांमध्येही प्रिय झाला.

अशी काही वर्षे गेली. सदू शेतकी कॉलेजमध्ये जाऊन शेतकी विषयाचा पदवीधर झाला. प्रत्येक परीक्षेत त्याने पहिला वर्ग सोडला नाही. बक्षिसे व शिष्यवृत्त्या मिळविल्या.

एकीकडे सदू आपली प्रगती करून घेत होता तर दुसरीकडे बनगावचीही सुधारणा करण्यासाठी त्याने नाना प्रकारे प्रयत्न केले. आता सायली नदीवर धरण बांधले होते. त्यामुळे शेतीमळ्याला मुबलक पाण्याची सोय झाली. गावातले शेतकरी आता हुशार झाले होते. त्यांचीही एक तरुण पिढी पुढे आली होती. त्यांनी मळ्यात केवळ भाज्याच नव्हे तर वेगवेगळ्या फळ-

झाडांचीही लागवड केली. त्यापासून होणाऱ्या उत्पन्नाची वाढ होऊ लागली.

थोड्याच दिवसात गावात वीजही खेळू लागली. झोपडी न् झोपडी विजेच्या प्रकाशाने उजळून निघाली. काही छोट्या उद्योगधंद्यांनाही विजेचा उपयोग होऊ लागला.

बनगावातील शेतकऱ्यांना आता शेतातील बियांना खते घालून पिके तगडी व जास्त कशी येतील हे कळू लागले. त्यामुळे ज्वारी, तांदूळ, ऊस, मका इत्यादी बनगावात पिकलेल्या पिकाला प्रदर्शनात बक्षिसे मिळाली. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी करण्याऐवजी यांत्रिक नांगरणी करण्यासही त्यांनी सुरुवात केली.

अभयगडाची डागडुजी होऊन सरकारने नदीकाठी प्रवाशांसाठी एक विश्रामधामही बांधले. बनगावापर्यंत एस्. टी. ची वाहतूक सुरू झाली. त्यात परदेशी प्रवासीही असत. गडाजवळ आधुनिक प्रकारचे उपहारगृहही झाले.

शाळेची इमारत केव्हाच बांधली गेली. प्रथम फक्त एक हॉल बांधण्याची कल्पना होती. पण मुलांनी जमविलेला फंड व व सरकारी मदत यामुळे एक दुमजली शाळागृह बांधले गेले. सध्या मुलीही त्याच शाळेत जाऊ लागल्या होत्या, तथापि लवकरच मुलींसाठी एक वेगळी शाळा बांधण्यात येणार आहे असे बोलले जाऊ लागले.

लवकरच बनगाव एक भाजीपाला, फळे, ऊस इत्यादी बाजाराचे ठिकाण म्हणून ओळखले जाऊ लागले. जुनी म्हातारी माणसे आता थोडीच राहिली होती. पण जी होती ती बनगावच्या प्रगतीच्या बाबतीत सदूला नेहमी दुवा देत.

पण सदू त्यावेळी परदेशी गेला होता. पदवीधर झाल्यावर

त्याला अमेरिकेतील एका विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली. दोन वर्षे तेथे राहून त्याने शेतकीच्या आधुनिक पद्धतीचा, तसेच गुरांच्या निरोगी व निकोप वाढीसंबंधी शिक्षण घेऊन काही स्वतंत्र संशोधनही केलें व मग तो मायदेशी परतला.

रघूने डॉक्टर होऊन गावातच प्रॅक्टीस सुरू केली होती. सदू परत आल्यावर सरकारी शेतकी खात्यात त्याला एक अधिकाराची बडी नोकरी मिळाली. तिचा स्वीकार करण्यापूर्वी आपल्या मातापित्याप्रमाणेच विष्णूमास्तरांचे उरलेले आयुष्य सुखात जाण्यासाठी सदू नेहमी प्रयत्नशील राहिला.

बनगावच्या सदूसारख्या मुलाने एका निरक्षर शेतकरी कुळात जन्म घेऊनही विष्णूमास्तरांसारख्याचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे केवढे तरी कार्य केले. त्यांच्या अंगची जिद्द लक्षात घेण्यासारखी आहे.

बनगावला 'आदर्श गाव' म्हणून बक्षीस मिळाले. बनगावचे लोक मात्र सदूला कधीही विसरले नाहीत. 'केल्याने होत आहे रे' हे रामदास स्वामींचे बोल सदूसारख्या एका खेडवळ पण उद्योगी व धडपड्या मुलाने सार्थ करून दाखविले.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क्र. ७४५०९ नों दि
दि. ९।०१।८

IRBK-0114761